दैनिक
# लोकविजय
संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक २०१) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) शनिवार, दि.०८ ऑगस्ट २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)

## भाजपची उमेदवारी तुमच्या सांगण्यावरून दिली जाते, या थापा मारणे बंद करा, आमदार राजेश वानखडेंची रवी राणांवर टीका

अमरावती दि.७ (प्रतिनिधी)- तिवसा मतदारसंघात बदल निश्चित असल्याचे वक्तव्य युवा स्वाभिमान पक्षाचे आमदार रवी राणा यांनी केल्यानंतर त्याचे तीव्र पडसाद भाजपच्या दुसऱ्या गटात उमटले आहेत. भाजपची उमेदवारी तुमच्या सांगण्यावरून दिली जाते, या थापा मारणे बंद करा, आमच्या पक्षात लुडबूड करू नका, असा स्पष्ट इशारा भाजपचे तिवसाचे आमदार राजेश वानखडे यांनी रवी राणांना दिला आहे. पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी रवी राणांवर जोरदार टीका केली. राजेश वानखडे म्हणाले, खोटारडेपणा, बनवा बनवी, वैचारिक कोलांटउड्या, न केलेल्या कामाचे खोटे श्रेय घेणे आणि नौटंकी हा रवी राणांच्या राजकारणाचा पाया आहे. अमरावती जिल्ह्यातील भाजप संघटना खिळखिळी झाली तर महायुतीतले तुमचे वजन वाढते राहील, या भावनेने तुम्ही भाजपला नख लावण्याचा प्रयत्न करता हे आम्ही खपवून घेणार नाही. महापालिका निवडणुकीत भाजपसोबत तुम्ही केलेली बेईमानी आम्ही विसरलेलो नाही. त्याचे दुष्परिणाम तुम्हाला योग्य वेळी भोगावेच लागतील, असा इशारा राजेश वानखडे यांनी दिला. तिवसा मतदारसंघात उमेदवारी जाहीर होईपर्यंत तुम्ही कोणकोणते गेम केले, याची आम्हाला पूर्ण कल्पना आहे. भाजपची उमेदवारी तुमच्या सांगण्यावरून दिली जाते, या थापा मारणे बंद करा. महायुतीचा धर्म निभवा. आमच्या पक्षात लुडबुड करू नका. पक्ष नेतृत्वासमोर लोटांगण आणि इकडे कार्यकर्त्यांचे खच्चीकरण ही नौटंकी बंद करा. कुठल्या मतदारसंघात बदल होणार, हे जनतेने ठरवले आहे. बदल कुठे आणि कसा झाला याचे उत्तर येणारा काळच देईल, असा सल्ला राजेश वानखडे यांनी रवी राणांना दिला.

# शेतकरी कर्जमाफी योजनेत शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ५ हजार कोटी जमा

मुंबई दि.७ (प्रतिनिधी)- राज्य सरकारच्या महत्वकांक्षी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेतून तब्बल ९४ हजार आयकरदाते शेतकरी अपात्र ठरले आहेत. तर या योजनेतील उर्वरित १६ लाख ९४ हजार पात्र शेतकऱ्यांपैकी ६ लाख २२हजार शेतकऱ्यांच्या पीक कर्ज खात्यात आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ५ हजार २८ कोटी रुपये एकाचवेळी जमा करण्यात आली. त्यानंतर या शेतकऱ्यांना बँकांनी त्वरित नव्याने पीक कर्ज द्यावे असे आदेश राज्य सरकारने दिले आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजनेचा आढावा घेतला. यावेळी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, सहकार विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे सहकार आयुक्त दीपक तावरे आदी उपस्थित होते. या योजनेअंतर्गत विविध बँकांनी सुमारे ३२ लाख कर्जखात्यांची माहिती पोर्टलवर अपलोड केली आहे. सहकार आयुक्त व निबंधक यांच्या कार्यालयाकडून प्राप्त माहितीनुसार सदर योजनेअंतर्गत निकषानुसार पात्र ठरलेल्या थकबाकीदार शेतकऱ्यांपैकी सुमारे १६.९६ लाख शेतकऱ्यांची पहिली यादी २५ जुलै रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यापैकी काल पर्यंत १२ लाख १०हजार कर्जखात्यांचे आधार प्रमाणिकरण करण्यात आले आहे.

आज मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते वरीलप्रमाणे आधार प्रमाणिकरण पुर्ण झालेल्या सुमारे ६लाख २२हजार पात्र लाभार्थ्यांच्या कर्जखात्यात ५हजार २८ कोटी रुपये ऑनलाईन पोर्टलव्दारे थेट संबंधित लाभार्थ्यांच्या कर्जखात्यावर हस्तांतरीत करण्यात आले. या योजनेचा लाभ मिळालेल्या लाभार्थ्यांना तातडीने खरीप पीक कर्ज वाटप करण्याबाबत सर्व बँकांना शासनामार्फत निर्देश देण्यात आले आहेत. पहिल्या यादीतील उर्वरित शेतकऱ्यांचे आधार प्रमाणिकरण पूर्ण झाल्यानंतर त्यांच्या कर्जखात्यावर लाभाची रक्कम हस्तांतरीत करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना जाहीर केली आहे. त्या योजनेच्या अंतर्गत आषाढी एकादशीला आपण पहिली यादी घोषित केली होती. घोषित केलेली यादी ही आपण सर्व ग्रामपंचायतींना पाठवली होती. शेतकऱ्यांनी केवळ आधार ऑथेंटिकेशन करायचं आहे. कुठलाही अर्ज नाही किंवा कुठल्याही प्रकारचे इतर गोष्टींची आवश्यकता नाही असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. ॲग्रीस्टॅक नंबर आणि आधार ऑथेंटिकेशन करून त्यांची खाती नील करायची अशा प्रकारचं आपण काम हातामध्ये घेतलं होतं आज जवळपास ५०२९ कोटी रुपयांचा पहिला हप्ता ६ लाख २२ हजार २०७ शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये गेला आहे आणि ही खाती नील झालेली आहेत, असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं.

शेतकऱ्यांचे मध्यंतरी काही गैरसमज असे झाले होते की की आमच्यावरच कर्ज जास्ती दिसतय आणि आमच्या नावावर मंजूर पैसे कमी आहेत. त्याचं कारण जे काही एनपीए वर लावलेलं व्याज होतं, त्या व्याजामुळे ते जास्त दिसत होतं. बँकांनी ते व्याज रद्द केल्यामुळे आता अकाउंट मधले पैसे आणि शासनाने त्यांच्या अकाऊंटला भरलेले पैसे म्हणजे कर्जाचे अकाऊंट मधले पैसे आणि शासनाने भरलेले पैसे हे सारखे असल्यामुळे ही अकाउंट नील झालेली आहेत, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. आता रोज मोठ्या प्रमाणात ही अकाउंट्स येता आहेत अशी व्यवस्था केलेली आहे. जसे जसे अकाउंट येतील ऑथेंटिकेट होतील तसं तसं त्या खात्यांमध्ये पैसे जातील, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

# एससी-एसटी आरक्षणात क्रिमी लेयरचे तत्त्व लागू होत नाही; केंद्र सरकारचे सुप्रीम कोर्टात प्रतिज्ञापत्र

नवी दिल्ली दि.७ (वृत्तसंस्था)- केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात एक प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे, ज्यात म्हटले आहे की अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांच्या आरक्षणाला क्रिमी लेयरचे तत्त्व लागू होत नाही. सरकारने एससी-एसटी आरक्षणात क्रिमी लेयर तत्त्वाची अंमलबजावणी आणि सरकारी नोकऱ्यांसाठी अधिक न्याय्य आरक्षण धोरणाची मागणी करणाऱ्या जनहित याचिकांना विरोध केला आहे. केंद्र सरकारने म्हटले आहे की, या याचिकांमुळे संविधानांतर्गत कोणत्याही मूलभूत हक्कांचे उल्लंघन होत नाही. शिवाय, विद्यमान कायद्यात एससी आणि एसटी यांना क्रिमी लेयरचे तत्त्व लागू करण्याची तरतूद नाही. सरकारच्या मते, ही संकल्पना केवळ ओबीसी आणि एसईबीसी आरक्षणांना लागू आहे.

गेल्या वर्षी ११ ऑगस्ट रोजी, सर्वोच्च न्यायालयाने रामाशंकर प्रजापती आणि इतरांनी दाखल केलेल्या जनहित याचिकांवर केंद्र आणि राज्य सरकारांना नोटीस बजावली होती. याचिकेत म्हटले आहे की, जर अनुसूचित जाती-जमाती कुटुंबातील सदस्याने यापूर्वीच घटनात्मक किंवा वरिष्ठ सरकारी पद भूषवले असेल, तर त्यांच्या मुलांना आरक्षणाचे लाभ मिळू नयेत. यामुळे आरक्षणाचे लाभ आर्थिकदृष्ट्या दुर्बळ आणि गरजू लोकांपर्यंत अधिक समानतेने पोहोचतील हे सुनिश्चित होईल. याचिकाकर्त्यांनी अशीही मागणी केली आहे की, आर्थिकदृष्ट्या दुर्बळ घटकांना उप-श्रेण्यांमध्ये निर्माण करून त्यांना प्रवेश आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये प्राधान्य दिले जावे. केंद्र सरकारने म्हटले आहे की, अनुसूचित जाती-जमातींच्या यादीत दुरुस्ती करण्याचा अधिकार केवळ संसदेला आहे. सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाने म्हटले आहे की, अनुसूचित जाती आणि जमातींच्या यादीत कोणतेही बदल केवळ संसदच करू शकते. घटनेच्या कलम ३४१ आणि ३४२ नुसार, कोणत्याही जाती किंवा जमातीचा यादीत समावेश करण्याचा किंवा वगळण्याचा अधिकार केवळ संसदेला आहे.

केंद्र सरकारने असेही म्हटले आहे की, ही याचिका प्रस्थापित कायद्याकडे दुर्लक्ष करते. इंदिरा साहनी (मंडल आयोग) प्रकरणाचा संदर्भ देत सरकारने म्हटले आहे की, अनुसूचित जाती, जमाती आणि इतर मागासवर्गीयांची ओळख केवळ आर्थिक स्थितीवर नव्हे, तर ऐतिहासिक, सामाजिक आणि शैक्षणिक मागासलेपणाच्या आधारावर केली जाते.

केंद्र सरकारने म्हटले आहे की अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या प्रवर्गातील बहुतांश कल्याणकारी योजनांमध्ये उत्पन्न मर्यादा आधीपासूनच लागू आहेत, ज्यामुळे गरजूंपर्यंत लाभ पोहोचेल याची खात्री होते. सरकारने असेही म्हटले आहे की याचिकाकर्त्यांनी कोणत्या योजनांमध्ये बदल करणे आवश्यक आहे आणि या बदलांमुळे दारिद्र्यरेषेखालील लोकांना कसा फायदा होईल, हे स्पष्ट केले नाही.

# संसद परिसरात विरोधकांची निदर्शने, कामकाज सोमवारपर्यंत स्थगित

नवी दिल्ली दि.७ (वृत्तसंस्था)- विरोधी पक्षाच्या खासदारांनी शुक्रवारी मुसळधार पाऊस असूनही संसद परिसरात राम मंदिरातील देणगी चोरी तथा जंतर-मंतरवरील निदर्शनांत विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीमाराच्या मुद्द्यांवर जोरदार आंदोलन केले.

आज संसदेत फारसे कामकाज झाले नाही. विरोधकांच्या गदारोळातच सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग विकास (सुधारणा) विधेयक २०२६ लोकसभेत आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आले. त्यानंतर दोन्ही सभागृहांचे कामकाज सोमवारपर्यंत तहकूब करण्यात आले आहे.

राज्यसभेत विरोधी पक्षाच्या खासदारांनी "अमित शहा, सभागृहात या," अशा घोषणा दिल्या. त्यावर प्रतिक्रिया देताना केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांनी सांगितले की, अमित शहा सकाळपासून रात्रीपर्यंत संसदेतच असतात. त्यांनी लोकसभेत असेही नमूद केले की, अमित शहा यांच्या नावाच्या केवळ उल्लेखानेच दहशतवादी थरथर कापतात.

दरम्यान, शुक्रवारी सकाळी ९ वाजता लोकसभेच्या ४५ खासदारांनी पंतप्रधान मोदींची त्यांच्या निवासस्थानी नाश्त्यासाठी भेट घेतली. नॅशनलिस्ट सिटिझन्स पार्टी ऑफ इंडियाचे जगदीश बसुनिया म्हणाले, "पंतप्रधानांनी आम्हाला सांगितले की आपण सर्वजण एनडीए कुटुंबाचा भाग आहोत."

# केंद्रीय शिक्षणमंत्री पदासाठी देवेंद्र फडणवीसांची चर्चा

## देशातील तरुण पिढी आणि जेन-झी त्यांना स्वीकारणार नाही-पृथ्वीराज चव्हाण

मुंबई दि.७ (प्रतिनिधी)- केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या वृत्तानंतर देशाचे नवे शिक्षणमंत्री कोण होणार, यावर राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा रंगली असून, या अत्यंत महत्त्वाच्या पदासाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिल्लीत पाचारण केले जाण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. असे असले तरी, आजची तरुण पिढी (जेन-झी) आणि प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या काँग्रेसकडून त्यांना या पदावर कोणत्याही परिस्थितीत स्वीकारले जाणार नाही, असा दावा काँग्रेस नेते व माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केला आहे.



पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, २०२६ च्या नीट परीक्षा पेपर फुटी प्रकरणात महाराष्ट्रातील अनेक कोचिंग क्लासेस आणि पेपर तयार करणाऱ्यांची नावे समोर आली आहेत. महत्त्वाचे म्हणजे, फडणवीस हे राज्याचे गृहमंत्रीही आहेत, त्यामुळे त्यांच्यावर विश्वास व्यक्त करणे कठीण आहे. या संपूर्ण घोटाळ्यात महाराष्ट्रातील सत्ताधारी पक्षातील राजकीय नेत्यांचाही सहभाग होता का, हे केवळ निष्पक्ष एसआयटी चौकशीनंतरच स्पष्ट होऊ शकेल, असे चव्हाण यांनी म्हटले आहे.

पृथ्वीराज चव्हाण यांनी ट्विट करत म्हटले की, सीजेपी आणि तरुण पिढीने केलेल्या ऐतिहासिक आंदोलनामुळे अखेर केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांना आपले पद गमवावे लागले आहे. हा आंदोलकांचा मोठा विजय मानला जात असून, पंतप्रधानांनी तूर्तास प्रल्हाद जोशी यांच्याकडे शिक्षण मंत्रालायचा अतिरिक्त कार्यभार सोपवला आहे. जोशी यांच्याकडे आधीच तीन महत्त्वाची मंत्रालये असताना आता हे चौथे खाते जोडले गेले आहे. मात्र संसदेच्या आगामी पावसाळी अधिवेशनापर्यंत केलेली ही केवळ एक तात्पुरती सोय आहे.

पुढे पृथ्वीराज चव्हाण यांनी म्हटले की, कोलमाडलेली शिक्षण व्यवस्था रुळावर आणणे, शिक्षणासाठी अतिरिक्त निधी उपलब्ध करून देणे आणि आजच्या तरुण पिढीशी थेट संवाद साधू शकणाऱ्या एका राष्ट्रीय स्तरावरील पूर्णवेळ शिक्षण मंत्र्याची देशाला तातडीने गरज आहे. परंतु, सध्याच्या केंद्रीय मंत्रिमंडळात अशी खंत असलेला एकही नेता दिसत नाही. तसेच शिक्षण व्यवस्थेत आरएसएस विचारसरणीच्या निष्ठ वंतांची भरती केल्यामुळे ही परिस्थिती ओढवल्याची टीका चव्हाण यांनी केली आहे.

# कुणबी प्रमाणपत्र घेऊन ओबीसी जागेवर निवडणूक लढवणाऱ्यांना माझं समर्थन नाही-मनोज जरांगे

धाराशिव दि.७ (प्रतिनिधी)- मी राजकारणासाठी नाही, तर माझ्या गरीब मराठ्यांसाठी आरक्षण मागतो; ही माझी जुनीच भूमिका असल्याचे मत मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी व्यक्त केलं. त्याचबरोबर कुणबी प्रमाणपत्र घेऊन ओबीसी जागेवर निवडणूक लढणाऱ्यांसाठी माझं समर्थन कधीच नसल्याचं मोठं वक्तव्य देखील मनोज जरांगे पाटील यांनी केलं. ते धाराशिवमध्ये बोलत होते.

व्हॅलिडीटी असेल तरच निवडणुकीच्या असल्या कुटाण्यात पडा, मी असंही समाजाला सांगत असतो. पण मी सुरुवातीपासूनच गरीब मराठ्यांसाठी आरक्षण मागत आलो आहे. त्या मागणीवर मी कायम असल्याचे मत देखील मनोज जरांगे पाटील यांनी व्यक्त केले. मी कोणाचा मिंधा नाही महाविकास आघाडी असो नाहीतर महायुती असो माझ्या गरीब मराठा समाजासाठी मी लढतो. मला मित्रत्वाची गरज नाही मला समाजहीत महत्वाचं आहे. समाजाची लेकरबाळ मला अधिकारी करायचेत असेही जरांगे पाटील म्हणाले.

मनोज जरांगे पाटील यांनी आज पुन्हा एकदा एकनाथ शिंदेंवर हल्ला चढवला. तुम्ही प्रमाणपत्र रद्द केले तर मला मित्रत्वाची गरज नाही, मला समाज महत्त्वाचा असल्याचं सांगत जरांगेंनी हल्ला चढवला. आम्ही तुमची स्तुती केली म्हणून तुम्ही प्रमाणपत्र रद्द करता, आमच्या पोराचे मुडदे पडावेत का? असा सवाल करत तुम्ही मुडदे पाडणार असाल तर मला मित्रापेक्षा माझा समाज महत्त्वाचा आहे असे जरांगे म्हणाले. समाजालाही अपेक्षा आहेत असं म्हणत मनोज जरांगे यांनी पुन्हा एकदा एकनाथ शिंदेंवर निशाणा साधला.

# तरुणांना मोहन भागवत यांच्या प्रमाणपत्राची अजिबात गरज नाही-प्रियांका गांधी

नवी दिल्ली दि.७ (वृत्तसंस्था)- राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी 'जेन झी'चे समर्थन केले आहे. मोहन भागवत यांच्या वक्तव्यावरुन प्रियांका गांधींनी प्रतिक्रिया देताना तरुण आंदोलकांना मोहन भागवत यांच्या कोणत्याही सर्टिफिकेटची गरज नाही, असे वक्तव्य केले आहे. मोहन भागवत यांनी गुरुवारी मुंबईतील एका कार्यक्रमात जेन झींशी संवाद साधला. तरुणांच्या मागण्या रास्त असल्याचे सांगत भागवतांनी त्यांना पाठिंबा दिला होता. तरुणांनी केलेले आंदोलन त्यांना राष्ट्रविरोधी ठरवत नाही, असेही भागवत म्हणाले.



मोहन भागवत यांनी यावेळी लोकशाहीत निदर्शने संवादाचे एक वैध माध्यम असल्याचेही स्पष्ट केले. भागवत यांच्या विधानाबाबत पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला प्रियांका गांधी यांनी संसद भवन परिसरात उत्तर दिले. "तरुणांना मोहन भागवत यांच्या प्रमाणपत्राची अजिबात गरज नाही," असे प्रियांका गांधी म्हणाल्या. यावेळी प्रियांका गांधी यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यावरही टीका केली. गृहमंत्री घाबरले आहेत असा आरोप करत त्यांनी अमित शाह संसदेच्या दोन्ही सभागृहांत अनुपस्थित का आहेत? असा सवाल उपस्थित केला.

नीट पेपरफुटी प्रकरणी २० जुलै रोजी झालेल्या आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीचार्ज आणि इतर कारवाईचा उल्लेख यावेळी प्रियांका गांधी यांनी यावेळी केला. "शाहांनी सभागृहात येऊन याप्रकरणी भूमिका स्पष्ट करायला हवी, यात अडचण काय आहे? काही चुकीचे घडले असेल, तर त्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे," असे प्रियांका गांधी यावेळी म्हणाल्या.

## '...तर अण्णासाहेब पाटील महामंडळाच्या अध्यक्षपदाचा राजीनाम देईल', नरेंद्र पाटलांचा निर्वाणीचा इशारा

छत्रपती संभाजीनगर दि.७ (प्रतिनिधी)- राज्यात मराठा आरक्षण, कुणबी प्रमाणपत्रांची वैधता यावरून राजकीय वातावरण पेटलेले असतानाच आता अण्णासाहेब आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी नाराजी व्यक्त करत थेट अध्यक्ष पद सोडण्याचा इशारा दिला आहे.

महामंडळाचा व्यवस्थापकीय संचालक यांच्या मनमानी कारभारामुळे मराठा तरुणांना कर्जपुरवठा करता येत नाही, एकतर त्यांना हटवा किंवा त्यांची बदली करा, नाहीतर मीच अध्यक्ष पद सोडतो, अशी निर्वाणीची भाषा पाटील यांनी केली.

छत्रपती संभाजीनगर येथे माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी येणाऱ्या मंत्रीमंडळ बैठकीत आपण हा विषय मुख्यमंत्र्यांच्या कानावर घाल णार आहोत. एमडी विजयसिंह देशमुख यांना बदलले जाणार नसेल तर हे शोभेचे पद आपल्याला नको, अशा शब्दात त्यांनी नाराजी व्यक्त केली.

अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजयसिंह देशमुख यांनी कर्ज मंजूर करताना नाहक जाचक अटी टाकल्या आहेत. त्यामुळे कर्ज मिळवण्यात मोठ्या अडचणी निर्माण होऊन मराठा समाजात सरकार विरोधातला रोष वाढतो आहे. आपण ही बाब मुख्यमंत्र्यांच्याही कानावर टाकली होती, मात्र त्यावर कोणतीही कार्यवाही झाली नाही.

(पान ४ वर)

# मनोज जरांगे एकनाथ शिंदेंचे लाडोबा आहेत का?-गुणरत्न सदावर्ते

मुंबई दि.७ (प्रतिनिधी)- मनोज जरांगे हे सातत्याने देवेंद्र फडणवीस, चंद्रशेखर बावनकुळे यांच्याविषयी अवमानकारक भाषा वापरत आहेत. ही गोष्ट एकनाथ शिंदे यांना मान्य आहे का? ठाणे की रिक्षा हे गाणं ऐकल्यावर एकनाथ शिंदे यांना आग लागते. मग मनोज जरांगे पाटील चंद्रशेखर बावनकुळे यांचा उल्लेख बावनकुळ्या असा करतो, यावर एकनाथ शिंदे काहीच कसे बोलत नाहीत, असा सवाल ॲडव्होकेट गुणरत्न सदावर्ते यांनी उपस्थित केला. ते शुक्रवारी मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी त्यांनी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी कुणबी प्रमाणपत्रांच्या मुद्द्यावरुन देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर केलेल्या टीकेचा प्रतिवाद केला.

ज्या प्रकारे मनोज जरांगे बोलत आहेत, ते एकनाथ शिंदेंचे शिष्य आहेत का यात मला पडायचं नाही. पण ज्याप्रकारे व्यक्त होत आहेत, ते आक्षेपार्ह व्यक्त होणं आहे. या देशात संविधान अंमलात आणलं, त्यादिवशी कोणी पाटील म्हणून बोलण्यासाठी, राजा म्हणून बोलण्यासाठी कोणीही शिल्लक उरलेले नाहीत. त्यामुळे ज्याप्रकारे मनोज जरांगे पाटील इतर समाजाच्या नेत्यांबाबत अपमान करणारी, नीच भाषा वापरतात, तशाप्रकारे आम्ही भटक्या विमुक्त, ओबीसी, मागासवर्गीय, भिक्षुकी करणारे ब्राह्मण कोणाच्याही प्रतिष्ठेला धक्का लावू देणार नाही. मनोज जरांगेंनी तसं केलं कायदेशीर धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा गुणरत्न सदावर्ते यांनी दिला. मनोज जरांगे हा धंदेवाईक आहे. पीडब्ल्यूडी नगरविकास विभागाची टेंडर वाचायची त्याला सवय आहे. मनोज जरांगे पाटीलचा संबंध रेती उपश्याशी आहे, असा गंभीर आरोपही गुणरत्न सदावर्ते यांनी केला.

# मराठा समाजासाठी घेतलेले निर्णय बदलणार नाहीत; कुणबी नोंदींबाबतचे गैरसमज दूर करू-उदय सामंत

मुंबई दि.७ (प्रतिनिधी)- कुणबी नोंदी रद्द करण्यासाठी पत्र काढण्यात आले असून, मराठ्यांच्या नोंदी कमी करण्याचा कट रचला जात आहे, असा आरोप मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी नुकताच केला होता. त्यांच्या या आरोपामुळे राज्यात पुन्हा एकदा आरक्षणाचा मुद्दा तापला असताना, राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी पत्रकार परिषद घेत यावर राज्य सरकारची आणि महायुतीची भूमिका स्पष्ट केली आहे. जरांगे पाटलांच्या आरोपांना उत्तर देताना सामंत यांनी स्पष्ट केले की, कुणबी प्रमाणपत्राबाबत जे काही गैरसमज निर्माण झाले आहेत, ते सरकार नक्की दूर करेल. मराठा समाजासाठी घेतलेले निर्णय कोणत्याही परिस्थितीत बदलले जाणार नाहीत

मनोज जरांगे यांनी उपस्थित केलेल्या कुणबी नोंदींच्या मुद्द्यावर बोलताना उदय सामंत म्हणाले, या संपूर्ण प्रकरणाबाबत मी चंद्रशेखर बावनकुळे यांच्याशीही सविस्तर चर्चा केली आहे. बावनकुळे यांनीही स्पष्ट केले आहे की, सध्या जे काही घडत आहे ते केवळ गैरसमजातून होत आहे. महायुती सरकारने मराठा समाजाप्रती जे निर्णय घेतले आहेत, ते बदलण्याचा सरकारचा कोणताही विचार नाही आणि तसे होणारही नाही."

सोशल मीडियावर फिरणाऱ्या काही व्हिडिओंचा संदर्भ देत सामंत यांनी विरोधकांवरही निशाणा साधला. ते म्हणाले, "काही व्हिडिओ पाहून तुम्हाला समजले असेल की काही लोक जाणीवपूर्वक उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबद्दल गैरसमज पसरवण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र, मराठा समाजाला दिलेले १० टक्के आरक्षण आणि कुणबी दाखल्यांबाबत घेतलेली भूमिका ही

(पान ४ वर)

# तृणमूल आणि ठाकरे सेनेतून फुटलेल्या खासदारांना तुमच्या सोबत असल्याचा मोदींनी दिला विश्वास

नवी दिल्ली दि.७ (वृततसंस्था)- पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आज युतीमधील खासदारांची बैठक घेतली. लोकसभेत सुरु असणाऱ्या कोंडीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान मोदींनी खासदारांशी संवाद साधत, चर्चेत सहभागी होण्याचे आवाहन केले. "संसद लोकशाहीचे सर्वोच्च मंदिर आहे", असेही पंतप्रधान मोदी यावेळी म्हणाले. संसदेच्या दोन्ही सभागृहात सध्या सुरु असणाऱ्या गोंधळावर मोदींनी चिंता व्यक्त केली. तसेच, या गोंधळामुळे नव्या खासदारांनी बोलण्याची संधी मिळत नसल्याचेही त्यांनी नमूद केले.



"नव्या सदस्यांसाठी ही बाब योग्य नाही, संसदेचे कामकाज सुरळीत चालायला हवं", असेही पंतप्रधान नरेंद्र मोदी खासदारांशी संवाद साधताना म्हणाले. मोदींनी यावेळी खासदारांनी वाचन आणि अभ्यास करण्याचेही आवाहन केले शिवाय संसदेचा इतिहास समजून घेण्याचे आवाहन केले. "संसदेत ऐतिहासिक गोष्टींचा खजिना आहे, त्याचा चर्चा करण्यासाठी वापर करा. आपल्या राज्याचा विकास करण्यासाठी काम करा. राज्याचा विकास झाला तरच देशाचा विकास होईल", असे पंतप्रधान मोदी यावेळी म्हणाले.

पंतप्रधान मोदींनी साधलेल्या सकाळच्या संवादात एकूण ४५ खासदारांनी सहभाग घेतला होता. यावेळी एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचे ७, राष्ट्रीय सिटिझन पार्टीचे २० आणि अजित पवारांच्या

(पान ४ वर)

# अखखा महाराष्ट्र आठ वेळा पालथा घातलाय, मला रणनीतीकारांची गरज नाही

## प्रशांत किशोर-सुनेत्रा पवारांच्या भेटीनंतर सुनील तटकरेंची प्रतिक्रिया

मुंबई दि.७ (प्रतिनिधी)- प्रसिद्ध रणनीतीकार प्रशांत किशोर आणि राष्ट्रवादीच्या अध्यक्षा सुनेत्रा पवार यांच्या भेटीवर राष्ट्रादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरेंनी मोठी प्रतिक्रिया दिली आहे. त्यांची ही भेट औपचारिक असावी, पण त्यामध्ये काय चर्चा झाली याची मला माहिती नाही. तसेच आम्ही फिल्डवर काम करणारे कार्यकर्ते आहोत, आठ वेळा अखखा महाराष्ट्र पालथा घातलाय. त्यामुळे आपल्याला रणनीतीकारांची गरज नाही, असंही सुनील तटकरे म्हणाले.

बिहारमध्ये मोठा विजय मिळाल्यानंतर प्रशांत किशोर यांनी सुनेत्रा पवार यांची भेट घेतली. त्यामध्ये झालेल्या चर्चांमध्ये सुनील तटकरेंच्या कार्यशैलीवर काही प्रश्न उपस्थित करण्यात आल्याची माहिती समोर आली. याच मुद्द्यावर बोलताना सुनील तटकरेंनी प्रतिक्रिया दिली.

सुनील तटकरे म्हणाले की, "प्रशांत किशोर आणि सुनेत्रा पवार यांची भेट झाल्याची माहिती मिळाली. त्यांची ती औपचारिक भेट होती. त्यांची काय चर्चा झाली याबाबत मला माहिती नाही. आम्ही प्रॅक्टिकल आहोत. पवार साहेब,

(पान ४ वर)

# खड्डयांच्या शापातून रस्त्यांना मुक्ती कधी?

कोणत्याही कामाचे योग्य प्रकारे नियोजन केले तर त्याची दुरवस्था होत नाही. विशेषत: राज्यातील रस्त्यांच्या दुरवस्थेचा विचार करता, रस्त्यांचे बांधकाम व देखभाल अतिशय म हत्त्वाचे असते. रस्त्यांचे बांधकाम व्यवस्थित केले असेल व त्याची चांगल्याप्रकारे देखभाल केली जात असेल तर रस्त्यांची दुरवस्था होणार नाही. मात्र सध्या काही ठिकाणी मुसळधार पावसामुळे रस्त्यांची फार दुरवस्था झालेली दिसून येते. याचा परिणाम वाहनचालकांना वाहन चालवताना जीव मुठीत धरून वाहन चालवावे लागते.

आपण जरी नैसर्गिक कारण पुढे केले किंवा वाहतूकदारांना जबाबदार धरले तरी सार्वजनिक बांधकाम विभागाचे नियंत्रण असणे गरजेचे आहे. कारण राज्यामधील रस्त्यांची देखभाल करण्याची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाची असते. सध्या देशात रस्ते बांधणीला केंद्र सरकार अधिक पसंती देत आहे. मात्र रस्त्यांची दुरवस्था पाहून प्रवास कसा करावा असा प्रश्न सर्वसाधारण नागरिकांना पडला आहे. पावसामुळे सर्वत्र रस्त्यात खड्डे पडलेले दिसतात, तर काही ठिकाणी रस्ता एका बाजूने खचणे, दरड कोसळणे व रस्ता वाहून जाणे इत्यादी पाहायला मिळते. तरी सध्या खड्डे बुजविण्याचे काम ठिकठीकाणी सुरू असले तरी दुचाकी व चारचाकी वाहनचालकांना वाहन चालविताना तारेवरची कसरत करावी लागते. त्यात पादचाऱ्यांनाही या खड्डयांमधून चालताना त्रास सहन करावा लागतोय. ग्रामीण भागात तर रस्त्यांची दैनावस्था पाहायला मिळते. आजही खेड्यातील वाड्यांमध्ये रस्ते असले तरी त्यांची दुरवस्थाच आहे. त्यामुळे आजारी व्यक्तीला अगदी चादरीतून, पालखीतून उचलून घेऊन जावे लागते. असे चित्र आजही ग्रामीण भागात पाहायला मिळते. ही आपल्याकडे शोकांतिका आहे. रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यातील इशाळगडाच्या पायथ्याशी असलेल्या आदिवाशी पाड्यावर दरड कोसळली होती. तेव्हा तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सुमारे दीड तास पायी चालत जावे लागले होते. मात्र आजही इथे ग्रामस्थांना पायी जाण्याजोगा रस्ता नसल्याने इथल्या ग्रामस्थांची अवस्था अशीच पाहायला मिळते. या नागरिकांचे इथे रोज काय होत असेल याचा विचार न केलेला बरा. तेव्हा शासकीय स्तरावर गाव तिथे रस्ता आणि तोही सुस्थितीत हवा. गावाला जोडणाऱ्या प्रत्येक वाडीमध्ये जायला कायमस्वरूपी रस्ता केला पाहिजे. तेव्हा अशा गावांची दखल घेऊन शासन पातळीवर आदर्श गाव घोषित करावे. आज आपल्याकडे शहरीभागात रस्ते खड्डयात आहेत. खेड्यात तर अनेक रस्त्यावरील पूलही मोडकळीस आले आहे. बऱ्याच ठिकाणी रस्त्याच्या बाजूला गटारं नाही, मग सांगा पाणी वाहून कसे जाणार..!

याचा परिणाम डांबरीकरण केलेला रस्ता पावसाळ्यात वाहून जातो. नंतर रस्ता पावसाच्या पाण्याने वाहून गेला अशा प्रकारची वृत्त ऐकायला मिळतात. मुंबई-गोवा या राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरण करण्याचा निर्णय २०१० साली घेण्यात आला. अजूनही या महामार्गाचे काम पूर्ण झाले नाही. ३१ मे २०२५ पर्यंत रस्त्याचे काम पूर्ण होईल असे केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितले होते. आता मार्च २०२६ पर्यंत काम पूर्ण करण्याचे आदेश केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री यांनी काम करणाऱ्या कंपन्यांना दिले. मुंबई-गोवा महामार्गाचे काम सुरू झाल्यापासून आतापर्यंत सुमारे २४४० नागरिकांना आपल्या जीवाला मुकावे लागले आहे. तेव्हा लवकरात लवकर या राष्ट्रीय महामार्गाचे काम पूर्ण होवो ही तमाम कोकणातील नागरिकांची मागणी आहे.

बऱ्याचवेळा रस्त्यांची दुरवस्था झाली की पावसाचे कारण पुढे केले जाते. नंतर बातम्या प्रसिद्ध होतात. पावसामुळे रस्त्यांची दुरवस्था झाली असे असेल, तर मग सांगा यात कितपत सत्यता आहे असे वाटते. असे असेल तर देशातील सर्व रस्त्यांची दुरवस्था पाहायला मिळाली असती. यात जुने रस्ते सोडा नवीनही रस्त्यांची दुरवस्थाच असती. सध्या अनेक ठिकाणी रस्त्यावर मोठे खड्डे पडले असून त्यात पाणी साचल्याने वाहनचालक, पादचारी व रस्त्याला लागून असलेली दुकाने यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. यात काहींचा अपघात होऊन जीव गमवावा लागला आहे. यासाठी लवकर महामार्गाचे काम पूर्ण होणे गरजेचे आहे. म्हणजे चालक, पादचारी व रस्त्यालगतचे दुकानदार बिनधास्तपणे आपले काम करू शकतात. केवळ मुंबई-गोवा महामार्ग नव्हे तर देशात अलीकडच्या काळात अनेक ठिकाणी रस्त्यांच्या रुंदीकरणाचे काम सुरू आहे. त्यात काही ठिकाणी निधीअभावी अर्धवट कामे राहिली आहे. त्यामुळे याचा जास्त त्रास सर्वसाधारण नागरिकांना सहन करावा लागतो. तेव्हा राज्यातील महामार्गांचा विचार करता राष्ट्रीय महामार्गांची जबाबदारी ही राज्याची नसून केंद्र सरकारची असते. शहरातील रस्त्यांची जबाबदारी नगर पालिका, महानगर पालिका व स्थानिक स्वराज्य संस्थेची असते. ग्रामीण भागातील रस्त्यांची देखभाल राज्य सरकार त्याचप्रमाणे त्या जिल्ह्यातील जिल्हा परिषदेची असते. असे असले तरी यामध्ये सुजाण नागरिकांची भूमिका अतिशय म हत्त्वाची असते.

नागरिकांनी वाहतूक नियमांचे पालन करून आपल्या विभागात रस्त्यांची दुरवस्था झाली असल्यास लागलीच संबंधित विभागाला तक्रार करून रस्त्याच्या दुरुस्तीविषयी तत्काळ आवाज उठविणे आवश्यक आहे. तेव्हा आपल्या महाराष्ट्र राज्यातील रस्त्यांची दुरवस्था झाल्यामुळे त्याची कारणे शोधून उपायांची नि:पक्षपातीपणे अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. म्हणजे राज्यातील रस्त्यांची समृद्धी होण्याला वेळ लागणार नाही. शेवटी रस्त्यांच्या दुरवस्थेला जबाबदार कोण? असे जरी आपण म्हणत असलो तरी त्याला आपणच सर्वजण जबाबदार आहोत, हे मात्र निश्चित.

दर्जेदार रस्ते होण्यासाठी साहित्यही दर्जेदार वापरायला हवे. चांगल्या दर्जाचे साहित्य वापरले गेले तर रस्त्यांची आज ही स्थिती होणे शक्य नव्हते. कंत्राट देण्यापासून सुरू होणारी 'पर्सेंटेज' बंद व्हायला हवी. लोकांना चांगल्या सुविधा देण्यासाठी कंत्राटदाराला त्यांच्या कामाचा चांगला मोबादला मिळत नसेल, तर चांगले रस्ते कसे तयार होतील हा प्रश्नही येतोच. लोकांना चांगले रस्ते, चांगले पूल मिळायला हवेत पण त्यासाठी सर्वात आधी सार्वजनिक बांधकाम खात्यातील भ्रष्टाचार थांबवण्याचे शिवधनुष्य पेलण्याचे आव्हान आहे. भ्रष्टाचाराचा पडलेला खड्डा बुजवून सरकारने हे शिवधनुष्य पेलण्याचे धाडस दाखवले, तर राज्यातील रस्ते दर्जेदार होऊ शकतात आणि रस्तेही खड्डेमुक्त होतील.

# उपलब्ध नोंदी-जुळणारी वंशावळ असेल ते कुणबी पण ज्यांच्या नोंदी कुठेच नाहीत त्या मराठ्यांचे काय?

## मराठा क्रांती मोर्चाचा सवाल?

छत्रपती संभाजीनगर, दि. ७ (प्रतिनिधी) - ज्यांच्या नोंदी उपलब्ध आहेत आणि सोबत जुळणारी वंशावळ सुद्धा असेल ते कुणबी प्रमाणपत्र मिळण्यासाठी पात्र ठरतील पण ज्यांच्या नोंदी कुठेच उपलब्ध नाहीत त्या मराठ्यांचं काय ? असा जळजळीत सवाल मुंबई मराठा क्रांती मोर्चाने उपस्थित केला आहे.

साडेतीन वर्षा मध्ये सरकारने नवीन काही दिलेले नाही. फक्त ज्यांच्या नोंदी होत्या, त्या नोंदी शोधणे सोयीस्कर केलं...कोणतही गॅजेटर लागू करून सरसकट मराठा समाजाला फायदा होणार नसुन राज्य शासनाला अधिकार नसतानाही सर्वोच्च न्यायालयाच्या न्याय निर्देशा विरुद्ध कुठलाही सुधारीत आदेश काढण्याचा राज्य शासनाला अधिकार नसल्याची बाब अनेक वेळेस राज्य शासना समोर प्रत्यक्ष आणणारे मराठा सम ाजाच्या वतीने सर्वोच्च न्यायालय आणि मुंबई उच्च न्यायालयातील मुख्य हस्तक्षेप याचिका कर्ता जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांचेच कायदेशीर म्हणणे सतत खरे ठरत असुन त्यांचे सततचे पोट तिडकीने सादर होणारे सादरीकरण सांगते की हैदराबाद गॅझेटर , सातारा गॅझेटर ,कोल्हापूर गॅझेटर , किंवा कुठलेही गॅजेटर नुसार मराठा समाजाला सरसगट आरक्षण देता येत नाही. जरी जात प्रम ाण पत्र मिळवली तरी त्या जात प्रमाणपत्रांची पडताळणी म्हणजे व्हॅलिडिटी होणार नाही हे सुद्धा त्यांचे म्हणणे सातत्याने सत्य ठरत आहे त्याचे कारण असे आहे कि गॅझेटर मध्ये फक्त जनसंख्या आहे. त्या जनसंख्येनुसार सरसकट मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देता येत नाही.

जे कुणबी समाज बांधव होते त्यांच्या नोंदी शोधणे म्हणजे त्या आहेत म्हणून सापडत आहेत आणि हे काम न्यायमूर्ती संदीप शिंदे समितीचे काम होतं आणि ते त्यांनी केलं आहे. ज्यांच्या नोंदी सापडल्या आहेत त्यांना कुणबी प्रमाणपत्र द्यायला कोणीही आडवू शकत नाही. परंतु काही एक नोंदी उपलब्ध नसणाऱ्या ९०% मराठा समाजाच्या आरक्षणाचे काय? ही महत्वाची कायदेशीर सम स्या कोकण, मुंबई,नवी मुंबई, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्यात सुद्धा असल्यामुळे मराठा समाजाला आरक्षण भेटण्यासाठी घटनात्मक व कायदेशीर मार्गाच्या मागणी चा अवलंब करुन उपोषण, जनआंदोलन,म हामोर्चा,शक्ति प्रदर्शन केल्या गेले नाही आणि हे केल्या गेले असते तर आरक्षणाचा प्रश्न कधीच निकाली निघाला असता व सुटला देखील असता. हा प्रयत्न गेली अनेक वर्ष करतांना घटनात्मक व कायदेशीर आरक्षण घटना दुरुस्ती शिवाय मिळणार नाही आणि तशी घटना दुरुस्ती करण्याचा अधिकार फक्त केंद्र शासनाला आहे हे संपुर्ण सत्य जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील शासना च्या व मराठा समाजाच्या लक्षात आणुन देत होते पण कोणीही लक्ष दिले नाही आणि हीच कायदेशीर बाब संपुर्ण पणे लक्षात घेऊन मुंबईतील मराठा समाजामध्ये जनजागृती करून मुंबईतील व राज्यातील गरजवंत, वंचित मराठा बांधवांना संघटित करून दिल्लीमध्ये मोठ जन आंदोलन उभं करण्यासाठी मुंबईतील वेगवेगळ्या विभागातील मराठा बांधवांच्या भेटी घेऊन संघटित करण्याच्या निर्णय घेण्यात आला असुन अनेक बैठका देखील संपन्न झाल्या असुन सदर मिटींगला रामचंद्र शेडगे, दिनेश पवार सुभाष शेजवळ,अनिल मामा सुर्वे,शैलेश शिंदे,राकेश वासुदेव, सुशील निकम आदी मान्यवर प्रत्यक्ष उपस्थित राहून अशा कार्यक्रमा मध्ये स्पष्ट निर्णय घेण्यात आला की केंद्रातून आरक्षणाची मर्यादा वाढवून घेणे या मागणीसाठी मराठा क्रांती मोर्चा दिल्लीमध्ये जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांचे मार्गदर्शना खाली जंतर- मंतर मैदानावर आंदोलन करण्याची तयारी करीत असुन मुंबई मध्ये विभाग निहाय बैठकांचे नियोजन सुरु करण्यात आले आहे.

# पैठणी साडी : हातमाग परंपरेची वारसा

**- सुजाता मोरे**

भारत हा विविध कला, संस्कृती, परंपरा आणि लोककौशल्यांनी समृद्ध असलेला देश आहे. भारतीय संस्कृतीच्या या वैभवशाली परंपरेमध्ये वस्त्रकलेला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. देशातील विविध भागांमध्ये विकसित झालेल्या पारंपरिक वस्त्रप्रकारांनी भारतीय संस्कृतीची ओळख जगभर निर्माण केली आहे. यामध्ये महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अस्मितेचे प्रतीक असलेली पैठणी साडी ही विशेष उल्लेखनीय आहे. पैठणी ही केवळ एक साडी नसून ती महाराष्ट्राच्या इतिहासाची, कलात्मकतेची, परंपरेची आणि कुशल कारागिरांच्या अथक श्रमांची जिवंत साक्ष आहे. ७ ऑगस्ट रोजी साजरा होणाऱ्या राष्ट्रीय हातमाग दिनानिमित्त पैठणीसारख्या पारंपरिक हातमाग उत्पादनांचा गौरव करणे म्हणजे भारतीय कला, कौशल्य आणि श्रमसंस्कृतीचा सन्मान करणे होय. पैठणीच्या प्रत्येक धाग्यामध्ये महाराष्ट्राची संस्कृती, इतिहास, सौंदर्यदृष्टी आणि कारागिरांच्या पिढ्यानब पिढ्या जपलेल्या कौशल्याचा अनमोल ठेवा सामावलेला आहे.

पैठणीचा इतिहास अत्यंत प्राचीन आणि गौरवशाली आहे. महाराष्ट्रातील गोदावरी नदीच्या काठावर वसलेल्या प्राचीन पैठण नगरीच्या नावावरून या साडीला 'पैठणी' हे नाव प्राप्त झाले. सातवाहन काळापासून पैठण हे व्यापार, संस्कृती आणि कलांचे एक महत्त्वाचे केंद्र म्हणून प्रसिद्ध होते. प्राचीन काळात पैठण येथून तयार होणाऱ्या उत्कृष्ट दर्जाच्या वस्त्रांची देश-विदेशात मोठ्या प्रमाणावर मागणी होती.

भारतीय रेशीम आणि सूती वस्त्रांच्या व्यापारात पैठणचे महत्त्वपूर्ण स्थान होते. रोमन साम्राज्याशी भारताचा व्यापार सुरू असताना पैठण परिसरातील वस्त्रांना मोठी प्रतिष्ठा प्राप्त झाली होती. त्यामुळे पैठणीचा इतिहास हा केवळ एका साडीचा इतिहास नसून महाराष्ट्राच्या प्राचीन व्यापार, कला आणि सांस्कृतिक समृद्धीचा इतिहास आहे.

पैठणी निर्मिती ही अत्यंत कौशल्यपूर्ण आणि संयमाची प्रक्रिया आहे. पारंपरिक पद्धतीने पैठणी तयार करण्यासाठी उच्च प्रतीच्या रेशमी धाग्यांचा वापर केला जातो. धाग्यांना विशिष्ट पद्धतीने रंग देणे, त्यांची योग्य मांडणी करणे, हातमागावर विणकाम करणे आणि नक्षीकाम साकार करणे यासाठी विणकरांना मोठे कौशल्य आवश्यक असते. एक उत्कृष्ट पैठणी तयार करण्यासाठी अनेक दिवस, कधी कधी अनेक महिने लागतात. विणकर आपल्या अनुभव, कल्पकता आणि कलात्मक दृष्टीच्या साहाय्याने प्रत्येक पैठणीला एक वेगळे रूप देतात. त्यामुळे प्रत्येक पैठणी ही एक स्वतंत्र कलाकृती मानली जाते. मशीनवर तयार होणाऱ्या वस्त्रांपेक्षा हाताने विणलेल्या पैठणीचे महत्त्व याच कारणामुळे अधिक आहे.

पैठणीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे तिची आकर्षक रंगसंगती आणि वैशिष्ट्यपूर्ण नक्षीकाम. पारंपरिक पैठणीमध्ये मोर, कमळ, आंबी, नारळी, अश्रफी, वेलबुट्टी आणि विविध प्रकारच्या पारंपरिक आकृत्यांचा वापर केला जातो. पैठणीच्या पदरावर विणले जाणारे मोराचे चित्र हे तिची खास ओळख मानले जाते. भारतीय संस्कृतीमध्ये मोर हा सौंदर्य, समृद्धी आणि शुभतेचे प्रतीक मानला जातो. त्यामुळे पैठणीच्या पदरावरील मोराची नक्षी विशेष आकर्षण निर्माण करते. सोन्या-चांदीच्या झरीचा वापर, रेशमी धाग्यांची चमक आणि रंगांची सुंदर सांगड यामुळे पैठणीला राजेशाही स्वरूप प्राप्त होते.

महाराष्ट्रातील यांच्या भावविश्वात पैठणीला अत्यंत मानाचे स्थान आहे. लग्नसमारंभ, सण-उत्सव, धार्मिक कार्यक्रम आणि विशेष प्रसंगी पैठणी परिधान करण्याची परंपरा अनेक वर्षांपासून चालत आली आहे. मुलीच्या विवाहाच्या वेळी माहेरकडून दिली जाणारी पैठणी ही प्रेम, आशीर्वाद आणि सन्मानाचे प्रतीक मानली जाते. अनेक कुटुंबांमध्ये आजी-आईकडून पुढील पिढीकडे पैठणी जपून ठेवण्याची परंपरा आहे. त्यामुळे पैठणी ही केवळ वस्त्र राहत नाही, तर ती कुटुंबाच्या आठवणी, भावना आणि सांस्कृतिक वारशाचा भाग बनते.

पैठणीच्या विकासामध्ये महाराष्ट्रातील विविध राजवटींचे योगदान राहिले आहे. सातवाहन काळापासून सुरू झालेली ही वस्त्रपरंपरा पुढे यादव, बहमनी, निजाम आणि मराठा काळात अधिक विकसित झाली. राजघराण्यांमध्ये पैठणीचा वापर प्रतिष्ठेचे आणि वैभवाचे प्रतीक म्हणून केला जात असे. विशेषतः मराठा काळात पैठणीला मोठा राजाश्रय मिळाला. दरबारातील स्त्रिया आणि उच्चवर्गीय समाजामध्ये पैठणीला विशेष स्थान होते. विविध राजवटींच्या प्रभावामुळे पैठणीच्या डिझाइनमध्ये, रंगांमध्ये आणि नक्षीकामामध्ये विविधता निर्माण झाली. या ऐतिहासिक प्रवासातून पैठणीने आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली.

पैठणीच्या निर्मितीमध्ये विणकर समाजाचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. अनेक विणकर कुटुंबांनी पिढ्यानब पिढ्या या कलेचे जतन केले आहे. त्यांच्या हातातील कौशल्यामुळेच पैठणीसारखी अप्रतिम कलाकृती आजही अस्तित्वात आहे. मात्र, या पारंपरिक कलेमागे असलेल्या विणकरांच्या समस्या अनेकदा दुर्लक्षित राहतात. मोठ्या मेहनतीनंतर तयार होणाऱ्या पैठणीला योग्य बाजारभाव मिळणे, कच्च्या मालाच्या वाढत्या किमती, आर्थिक अडचणी आणि बदलत्या बाजारपेठेतील स्पर्धा या सम स्या विणकरांसमोर आहेत. त्यामुळे पैठणीच्या संवर्धनाबरोबरच पैठणी विणणाऱ्या कारागिरांच्या आर्थिक आणि सामाजिक सक्षमीकरणाकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

आधुनिक काळात पैठणीसमोर अनेक आव्हाने निर्माण झाली आहेत. यंत्रमागावर तयार होणाऱ्या स्वस्त साड्यांमुळे पारंपरिक हातमाग पैठणीला स्पर्धेला सामोरे जावे लागत आहे. अनेकदा बनावट किंवा कमी दर्जाच्या साड्यांना पैठणी म्हणून विकले जाते, त्यामुळे ग्राहकांची फसवणूक होते आणि अस्सल पैठणी तयार करणाऱ्या कारागिरांचे नुकसान होते. अस्सल पैठणीची ओळख, तिची गुणवत्ता आणि पारंपरिक वैशिष्ट्ये याबाबत ग्राहकांमध्ये जागरूकता निर्माण करणे आवश्यक आहे. पैठणीसारख्या पारंपरिक वस्त्रांचे संरक्षण करण्यासाठी शासन, समाज आणि ग्राहक यांनी संयुक्त प्रयत्न करणे गरजेचे आहे.

पैठणीच्या संवर्धनासाठी विविध स्तरांवर प्रयत्न सुरू आहेत. पैठणीला भौगोलिक मानांकन मिळाल्यामुळे तिची स्वतंत्र ओळख अधिक मजबूत झाली आहे. विविध प्रदर्शनांमधून, सांस्कृतिक म होत्सवांमधून आणि डिजिटल माध्यमांद्वारे पैठणी देश-विदेशातील ग्राहकांपर्यंत पोहोचत आहे. आज अनेक विणकर आणि उद्योजक ऑनलाइन माध्यम ांचा वापर करून थेट ग्राहकांशी संपर्क साधत आहेत. डिजिटल तंत्रज्ञानामुळे पारंपरिक कलेला आधुनिक बाजारपेठ उपलब्ध होत आहे. यामुळे पैठणी उद्योगाला नव्या संधी निर्माण होत आहेत.

बदलत्या काळानुसार पैठणीने आधुनिकतेशीही जुळवून घेतले आहे. पारंपरिक नक्षी आणि रंगसंगती जपत नवीन डिझाइन, विविध प्रकारचे रंग आणि आधुनिक फॅशनच्या गरजेनुसार पैठणीमध्ये प्रयोग केले जात आहेत. अनेक फॅशन डिझायनर्सनी पैठणीला आधुनिक पोशाखांमध्ये स्थान दिले आहे. त्यामुळे तरुण पिढीमध्येही पैठणीविषयी आकर्षण वाढत आहे. भारतीय तसेच आंतरराष्ट्रीय फॅशन क्षेत्रात पैठणीला मिळणारी प्रसिद्धी ही तिच्या बदलत्या काळाशी जुळवून घेण्याच्या क्षमतेचे उदाहरण आहे.

पैठणी ही पर्यावरणपूरक जीवनशैलीचेही प्रतीक आहे. हातमागावर तयार होणाऱ्या या साडीच्या निर्मितीमध्ये मोठ्या प्रमाणावर मानवी कौशल्याचा वापर केला जातो. यंत्राधारित मोठ्या प्रमाणातील उत्पादनाच्या तुलनेत हातमाग उद्योग पर्यावरणासाठी अधिक अनुकूल आहे. आज जगभरात शाश्वत फॅशन आणि पर्यावरणपूरक उत्पादनांना महत्त्व दिले जात आहे. या पार्श्वभूमीवर पैठणीसारख्या पारंपरिक हातमाग वस्त्रांचे महत्त्व अधिक वाढले आहे.

राष्ट्रीय हातमाग दिन हा भारतीय हातमाग परंपरेचा गौरव करण्याचा दिवस आहे. या दिवशी पैठणीसारख्या पारंपरिक वस्त्रांचा सन्मान करणे म्हणजे केवळ एका साडीचा गौरव करणे नव्हे, तर तिच्यामागील हजारो वर्षांच्या परंपरेचा, असंख्य विणकरांच्या श्रमांचा आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अस्मितेचा सन्मान करणे होय. पैठणीच्या प्रत्येक धाग्यामध्ये महाराष्ट्राचा इतिहास, कला आणि संस्कृती विणलेली आहे. त्यामुळे या वारशाचे संरक्षण करणे, विणकरांना प्रोत्साहन देणे आणि अस्सल हातमाग उत्पादनांचा स्वीकार करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे.

पैठणी ही महाराष्ट्राची ओळख आहे, अभिमान आहे आणि सांस्कृतिक संपत्ती आहे. तिच्या रेशमी धाग्यांमध्ये केवळ सौंदर्य नाही, तर परंपरा, श्रम, भावना आणि इतिहासाचा संगम आहे. राष्ट्रीय हातमाग दिनाच्या निमित्ताने आपण पैठणीसारख्या अमूल्य वारशाचे जतन करण्याचा आणि या कलेला पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प केला पाहिजे. कारण पैठणीचा प्रत्येक धागा हा केवळ साडीचा भाग नसून महाराष्ट्राच्या गौरवशाली संस्कृतीचा एक अमूल्य धागा आहे.

- सुजाता मोरे,
(लेखिका, पर्यटन प्रशासनशास्त्राच्या अभ्यासक आहेत)

# युनायटेड वेस्टर्न - आयडीबीआय बँकेच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे नागपूर येथे राष्ट्रीय अधिवेशन

नागपूर दि. ७ (प्रतिनिधी) - युनायटेड वेस्टर्न बँक व आयडीबीआय बँकेतील सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेचे २९ वे वार्षिक अधिवेशन व वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. ९ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ वाजता स्वातंत्र्यवीर सावरकर सभागृह, लक्ष्मीनगर, नागपूर येथे आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती संघटनेचे अध्यक्ष अनंत कुलकर्णी यांनी दिली. या अधिवेशनाचे उद्घाटन * भारत सरकारचे केंद्रीय मंत्री मा. श्री. नितीनजी गडकरी यांच्या प्रमुख उपस्थितीत व त्यांच्या शुभहस्ते होणार आहे आहे. मराठवाडा विभागातून या अधिवेशनासाठी १५ प्रतिनिधी जाणार आहेत, अशी माहिती मराठवाडा विभागाचे विभागीय सचिव डॉ. अभय मंडलिक यांनी दिली आहे.

अधिवेशनात संघटनेच्या ७५ वर्षे पूर्ण केलेल्या ज्येष्ठ सभासदांचा विशेष सत्कार करण्यात येणार असून, निवृत्त कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा करून पुढील कार्यवाहीची दिशा निश्चित करण्यात येणार आहे संघटनेचे सुमारे १७०० सभासद आहेत. संघटनेचे भारतीय मजदूर संघ यांचेशी संल्लघ्नता आहे. भारतीय मजदुर संघ, नोबो, एनओबीडब्लु यांचे कांहीं पदाधिकारी प्रतिनिधी तसेच देशभरातील विविध राज्यांमधून सुमारे ५०० सभासद उपस्थित राहणार आहेत. युनायटेड वेस्टर्न बँकेची स्थापना सातारा येथे स्व. अण्णासाहेब चिरमुले यांनी स्वदेशी प्रेरणेचा भावनेतून केली होती. ऑक्टोबर २००६ मध्ये युनायटेड वेस्टर्न बँकेचे आयडीबीआय बँकेत विलीनीकरण झाले.

या दोन्ही बँकांतील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांमध्ये बंधुभाव व परस्पर सहकार्याची भावना वृद्धिंगत करणे, त्यांच्या आर्थिक, सामाजिक व वैद्यकीय प्रश्नांसाठी बँकेकडे सातत्याने पाठपुरावा करणे, गरजू सभासदांना मदत करणे तसेच विविध कल्याणकारी उपक्रम राबविणे या उद्देशाने संघटना कार्यरत आहे. संघटनेमार्फत सेवानिवृत्त सभासदांसाठी मेडिक्लेम योजना राबविण्यात येते. या योजनेत सहभागी होण्यापासून ते वैद्यकीय दाव्यांच्या मंजुरीपर्यंत सभासदांना आवश्यक मार्गदर्शन व सहकार्य करण्यात येते. याशिवाय संघटना सामाजिक बांधिलकी जपत विविध आपत्तीग्रस्तांना आर्थिक मदत तसेच समाजोपयोगी संस्थांनाही वेळोवेळी सहाय्य करत असल्याची माहिती विभागीय सचिव श्रीकांत वनकर यांनी दिली.

# राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानातील भरती प्रक्रिया रद्द; पुढील सेवा कंत्राटी पद्धतीने

छत्रपती संभाजीनगर, दि. ७ (प्रतिनिधी) - छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत सुरू असलेली भरती प्रक्रिया रद्द करण्यात आल्याचे स्पष्ट केले आहे. राज्य शासनाच्या नव्या धोरणानुसार यापुढे म नुष्यबळाची नियुक्ती थेट भरतीद्वारे न करता सेवा कंत्राट पद्धतीने करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

आयुक्त, शहरी आरोग्य, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांच्या दिनांक ७ ऑगस्ट २०२६ च्या पत्रानुसार राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, १५ वा वित्त आयोग तसेच हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना आदी योजनांअंतर्गत सुरू असलेल्या सर्व भरती प्रक्रिया तत्काळ रद्द करण्यात आल्या आहेत.

शासनाच्या धोरणानुसार, नागरी आरोग्य संस्थांमधील मनुष्यबळाची सेवा यापुढे ठोक मानधन तत्त्वावर बाह्य यंत्रणेमार्फत सेवा कंत्राटाद्वारे उपलब्ध करून घेतली जाणार आहे. त्यामुळे राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानांतर्गत यापूर्वी प्रसिद्ध करण्यात आलेल्या सर्व भरती जाहिराती रद्द समजाव्यात व या भरती प्रक्रियेतून कोणतीही पुढील नियुक्ती केली जाणार नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# कलियुगातील भीषण वास्तव ! बाप वृद्धाश्रमात मरून पडला, शिक्षक मुलीने ५१०० रुपये भरत अंत्यसंस्कार ऑनलाइन बघितले

**हरयाणातील** सोनीपत येथील ही घटना आहे. आयुष्यभर काबाडकष्ट करून आपल्या तीन मुलींना शिकवून स्वावलंबी बनवणाऱ्या एका पित्याला उतारवयात वृद्धाश्रमाचा आश्रय घ्यावा लागला आणि अखेरच्या वेळी मुलींनी प्रत्यक्षात येण्याऐवजी व्हिडीओ कॉलवरूनच वडिलांचे अंत्यदर्शन घेतले.

कापड व्यावसायिक शिवचरण रतन गुप्ता असे त्यांचे नाव असून ते दीर्घकाळापासून आजारी होते आणि त्यांना आयुष्याच्या शेवटी आपल्या मुलींना एकदा पाहण्याची तीव्र इच्छा होती. मात्र, त्यांचा मृत्यू झाल्यानंतर तिन्ही मुलींपैकी कोणतीही मुलगी वृद्धाश्रमात पोहोचली नाही. मुलींनी अंत्यसंस्कारासाठी ५ हजार १०० रुपये ऑनलाईन पाठवून दिले आणि वडिलांच्या अंत्यविधीचा व्हिडिओ मोबाईलवर पाठवण्याची विनंती केली. वृद्धाश्रमाचे प्रशासक आनंद कुमार यांनी दिलेल्या माहितीनुसार, गुप्ता यांनी मुलींच्या शिक्षणासाठी स्वतःचे आयुष्य वेचले होते.

त्यांच्यापैकी दोघी जणी पुढे शिक्षिका झाल्या आणि आपल्या मुलींच्या यशाचा वृद्ध पित्याला मोठा अभिमान होता. वडिलांनी स्वतःचे आयुष्य मुलींच्या भविष्यासाठी वाहून घेतले. पण त्याच पित्याला अखेरच्या निरोपाच्या वेळी एकाकी राहावे लागले.

# JESA आणि JESA-NX यांच्या संयुक्त विद्यमाने SKALEUP iBIZ 3.0 चा भव्य ग्रँड फिनाले ९ ऑगस्ट रोजी




छत्रपती संभाजीनगर, दि. ७ (प्रतिनिधी) – जैन इंजिनिअर्स सोसायटी असोसिएशन (JESA) आणि JESA-NX यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित SKALEUP iBIZ 3.0चा भव्य ग्रँड फिनाले रविवार, दि. ९ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी १.४५ वाजल्यापासून रुक्मिणी हॉल, एमजीएम परिसर, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित करण्यात आला आहे.

SKALEUP iBIZ 3.0 हे JESA आणि JESA - NX यांचे प्रमुख स्टार्टअप, इनोव्हेशन आणि उद्योजकता व्यासपीठ आहे. पहिल्या दोन यशस्वी पर्वांनंतर यावर्षी तिसरे पर्व अधिक व्यापक स्वरूपात आयोजित करण्यात येत आहे. या उपक्रमाचा उद्देश नवोदित उद्योजक आणि स्टार्टअप्सना असे व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा आहे, जिथे त्यांना अनुभवी उद्योगपती, गुंतवणूकदार, मार्गदर्शक (मेंटर्स), इन्क्युबेशन सेंटर्स तसेच बिझनेस लीडर्स यांचे मार्गदर्शन, नेटवर्किंग आणि आपल्या व्यवसायाला पुढील स्तरावर नेण्याची संधी मिळेल.

यावर्षी विविध इन्क्युबेशन सेंटर्सच्या माध्यमातून अनेक स्टार्टअप्सनी सहभाग नोंदविला आहे. ग्रँड फिनालेपूर्वी सहभागींसाठी अनेक ज्ञानवर्धक ऑनलाइन मेंटरशिप सत्रांचे आयोजन करण्यात आले. या सत्रांमध्ये देशातील नामवंत उद्योजक आणि तज्ज्ञांनी बिझनेस मॉडेल, गुंतवणूक, स्केलिंग, मार्केटिंग आणि नेतृत्व या महत्त्वपूर्ण विषयांवर सखोल मार्गदर्शन केले.

JESA-NX हा JESA चा युवा विभाग असून कार्यक्रमाचे नियोजन, स्टार्टअप समन्वय, स्वयंसेवक व्यवस्थापन तसेच युवकांमध्ये उद्योजकतेची संस्कृती रुजविण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. जीसा आणि JESA - NX यांचा हा संयुक्त उपक्रम परिसरातील नवोपक्रम आणि उद्योजकतेला नवी दिशा देणारा आहे.

ग्रँड फिनालेमध्ये निवडलेल्या स्टार्टअप्स प्रतिष्ठित परीक्षक मंडळासमोर आपल्या व्यावसायिक संकल्पना सादर करतील. विजेत्यांना प्रथम पारितोषिक ₹१,००,०००, द्वितीय पारितोषिक ₹५०,००० आणि तृतीय पारितोषिक ₹२५,००० प्रदान करण्यात येईल.

JESA चे अध्यक्ष प्रद्युम्न शाह म्हणाले, "SKALEUP iBIZ 3.0 ही केवळ स्पर्धा नसून युवा उद्योजकांना संधी, मार्गदर्शन आणि उद्योगजगताशी जोडणारे एक सक्षम व्यासपीठ आहे.

नवोपक्रम आणि उद्योजकतेची संस्कृती विकसित करून युवकांना रोजगारनिर्माते बनविणे हा आमचा उद्देश आहे. जीसा चे सचिव मयूर पाटनी यांनी सांगितले की, यावर्षीच्या आयोजनाला स्टार्टअप्स, इन्क्युबेशन सेंटर्स, उद्योगजगत, गुंतवणूकदार आणि शैक्षणिक संस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला आहे. ग्रँड फिनालेला अनेक नामवंत उद्योगपती, सामाजिक संस्थांचे पदाधिकारी, शिक्षणतज्ज्ञ, गुंतवणूकदार आणि उद्योजक उपस्थित राहणार आहेत.

जेसा चे कोषाध्यक्ष पंकज सुराणा यांनी सर्व उद्योगपती, उद्योजक, शैक्षणिक संस्था आणि नागरिकांना मोठ्या संख्येने उपस्थित राहून युवा स्टार्टअप्सना प्रोत्साहन देण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमाचे प्रोजेक्ट कन्व्हिनर श्री सुनील सेठी तसेच सह-प्रोजेक्ट कन्व्हिनर दिनेश मुथा, प्रसाद जैन आणि श्री सुदर्शन कटारिया यांनी सांगितले की, SKALEUP iBIZ 3.0 हा केवळ एक कार्यक्रम नसून परिसरातील नवोपक्रम आणि उद्योजकतेला चालना देणारा सातत्यपूर्ण उपक्रम आहे. त्यांनी सर्व स्टार्टअप्स, उद्योगजगत आणि नागरिकांना या कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले.

## मराठवाड्यासाठी अभिमानास्पद पहिले पाऊल

# तृतीयक-स्तर रुग्णालय आणि नॅक 'अ+' विद्यापीठ रोजगाराभिमुख वैद्यकीय इमेजिंग पदवीसाठी एकत्र




छत्रपती संभाजीनगर, दि. ७ (प्रतिनिधी) – मराठवाड्यातील आरोग्यसेवा शिक्षणाच्या क्षेत्रात महत्त्वाचे पाऊल टाकत कमलनयन बजाज रुग्णालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ (बामू) आणि दीनदयाळ उपाध्याय-कौशल्य केंद्र यांच्यात शुक्रवारी (७ ऑगस्ट) त्रिपक्षीय सामंजस्य करार (एमओयू) करण्यात आला. या करारामुळे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून चार वर्षांचा बी.एस्सी. वैद्यकीय इमेजिंग व रेडिओलॉजी तंत्रज्ञान अभ्यासक्रम संयुक्तपणे सुरू होणार आहे.

विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीत दुपारी १२.३० वाजता झालेल्या कार्यक्रमात कमलनयन बजाज रुग्णालयाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॉर्ज नोएल फर्नांडिस आणि विद्यापीठाचे कुलसचिव प्रा. प्रशांत एस. अमृतकर यांनी करारावर स्वाक्षरी केली. यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. (डॉ.) विजय फुलारी, प्र-कुलगुरू प्रा. (डॉ.) प्रवीण वक्ते, दीनदयाळ उपाध्याय कौशल्य केंद्राच्या संचालक प्रा. भारती गवळी तसेच नवोपक्रम, उष्मायन व सहसंबंध विभागाचे संचालक डॉ. एच. टी. जाधव उपस्थित होते.

**रोजगाराभिमुख शिक्षणाला चालना** – हा उपक्रम मराठवाड्यातील अशा प्रकारचा पहिला उपक्रम असल्याचे सांगण्यात आले. प्रगत तृतीयक-स्तर रुग्णालय आणि नॅक 'अ+' मानांकनप्राप्त राज्य विद्यापीठ एकत्र येऊन वैद्यकीय इमेजिंग क्षेत्रातील रोजगाराभिमुख पदवी अभ्यासक्रम उपलब्ध करून देत आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२०च्या अनुषंगाने हा अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. आठ सेमिस्टर आणि १७६ श्रेयांकांचा हा अभ्यासक्रम असून विद्यार्थ्यांना बहुविध प्रवेश व निर्गमनाच्या सुविधा उपलब्ध असतील. पदवी प्रमाणपत्र, पदविका, पदवी आणि अंतिम टप्प्यावर बी.एस्सी. (ऑनर्स) अशा विविध शैक्षणिक पर्यायांचा त्यात समावेश आहे.

### मराठवाड्यात प्रथमच वैद्यकीय इमेजिंग पदवी अभ्यासक्रमासाठी त्रिपक्षीय करार

कमलनयन बजाज रुग्णालय हे मराठवाडा मेडिकल अँड रिसर्च इन्स्टिट्यूट ट्रस्टचा घटक असून छत्रपती संभाजीनगरातील अग्रगण्य बहुविशेषता तृतीयक-स्तर रुग्णालय म्हणून ओळखले जाते. प्रगत निदान व इमेजिंग सुविधा तसेच शैक्षणिक आणि संशोधन क्षेत्रातील योगदानामुळे या उपक्रमाला प्रत्यक्ष वैद्यकीय प्रशिक्षणाची जोड मिळणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ हे मराठवाडा विभागाची सेवा करणारे नॅक 'अ+' मानांकनप्राप्त राज्य सार्वजनिक विद्यापीठ आहे. तर दीनदयाळ उपाध्याय-कौशल्य केंद्र हे विद्यापीठातील कौशल्य विकास केंद्र असून छडटऋ-अनुरूप व्यावसायिक आणि रोजगाराभिमुख शिक्षणाला प्रोत्साहन देते. या त्रिपक्षीय सहकार्यामुळे मराठवाड्यातील विद्यार्थ्यांना आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञानाचे दर्जेदार शिक्षण आणि प्रत्यक्ष प्रशिक्षणाची संधी मिळणार असून आरोग्य क्षेत्रासाठी कुशल मनुष्यबळ निर्माण होण्यास मोठी मदत होणार आहे.

**सीटी, एमआरआयसह आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण**

अभ्यासक्रमातून विद्यार्थ्यांना रेडिओग्राफी, सीटी स्कॅन, एमआरआय, मॅमोग्राफी आणि कॅथ-लॅब तंत्रज्ञानासह पीएसीएस प्रशासन व इमेजिंग ॲप्लिकेशन यांसारख्या क्षेत्रांत प्रशिक्षण दिले जाणार आहे. त्यामुळे कुशल सहसंबंधित आरोग्यसेवा व्यावसायिकांची गरज पूर्ण करण्यास मदत होणार असून भारतासह परदेशात रोजगार, उद्योजकता आणि उच्च शिक्षणाच्या संधी विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध होणार आहेत. वैद्यकीय इमेजिंगसोबतच भविष्यात न्यूक्लिअर मेडिसिनसह इतर आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञानाशी संबंधित अभ्यासक्रम सुरू करण्याचे उद्दिष्टही या उपक्रमातून ठेवण्यात आले आहे.

## कन्नड येथे जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय क्र. २ कार्यान्वित

# भूमी अभिलेखातील दुरुस्ती व अपील प्रकरणांच्या सेवा नागरिकांना होणार जलद उपलब्ध

छत्रपती संभाजीनगर, दि. ७ (प्रतिनिधी) – कन्नड शहर व परिसरातील नागरिकांना भूमी अभिलेखाशी संबंधित विविध सेवा जलद, सुलभ आणि स्थानिक पातळीवर उपलब्ध व्हाव्यात, यासाठी उपसंचालक भूमी अभिलेख, छत्रपती संभाजीनगर प्रदेश यांच्या अधिपत्याखाली जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, छत्रपती संभाजीनगर क्र. २, मुख्यालय कन्नड हे नवीन कार्यालय कार्यान्वित करण्यात आले आहे. या कार्यालयामार्फत दि. १५ जून २०२६ पासून नागरिकांना सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

नवीन कार्यालय संतराम कॉम्प्लेक्स, शरद पवार कॉलनीसमोर, चाळीसगाव रोड, कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर-४३११०३ येथे सुरू करण्यात आले आहे. भूमी अभिलेखाशी संबंधित कामांसाठी नागरिकांची गैरसोय होऊ नये तसेच प्रलंबित प्रकरणांचा जलदगतीने निपटारा व्हावा, या उद्देशाने शासनाने हे कार्यालय कार्यान्वित केले आहे.

या कार्यालयामार्फत नगर भूमापन अभिलेखामध्ये अनवधानाने झालेल्या त्रुटींची दुरुस्ती करण्यात येणार आहे. त्यामध्ये क्षेत्र दुरुस्ती, नाव दुरुस्ती, सत्ता प्रकार दुरुस्ती तसेच अपील प्रकरणे यांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे ७/१२ अभिलेखातील क्षेत्र, नाव, गट क्रमांक आदी बाबींशी संबंधित दुरुस्तीची प्रकरणेही नियमानुसार हाताळण्यात येणार आहेत. तसेच एकत्रीकरण कायद्यांतर्गत अभिलेखामध्ये अनवधानाने झालेल्या चुका तसेच संबंधित कायद्यातील कलम ३१ (अ) व ३२ अंतर्गत येणारी दुरुस्तीची कामे या कार्यालयामार्फत करण्यात येणार आहेत. संबंधित प्रकरणांचा जलदगतीने निपटारा करून नागरिकांना भूमी अभिलेखविषयक सेवा अधिक प्रभावीपणे उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात येणार आहे. कन्नड व परिसरातील नागरिकांनी भूमी अभिलेखाशी संबंधित व या कार्यालयाच्या कार्यकक्षेत येणाऱ्या प्रकरणांसाठी जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, छत्रपती संभाजीनगर क्र. २, मुख्यालय कन्नड या कार्यालयाशी संपर्क साधून उपलब्ध सेवांचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## कर्मयोगी; संत सावता महाराज

संत सावता महाराज
कर्माचे सर्वश्रेष्ठ पुजारी
कर्मावरच त्यांची
श्रद्धा असे भारी
कर्म व कष्टातच असते
अस्तित्व परमेश्वरांचे
सावंतांची शिकवण
कष्ट असावे परिश्रमाचे
सावंतांना ईश्वराची असे
अनुभूती शेती अवजारात
ईश्वराच्या भेटीची असे
आस शेती कामात
सावंतांचे प्राधान्य
असे शेती व्यवसायाला
कष्ट करतांना शेतात
नमन करा ईश्वराला
कांदा,मुळा आणि भाजी
लसून,मिरच्या कोथंबिरी
यातील कष्टातून दिसे
विठ्ठल आणि हरी
सावता महाराजांची
महान असे शेती कीर्ती
यातूनच शेतकऱ्यांना
ईश्वर देतो स्फूर्ती
शेती कष्टातून ईश्वराचे
दर्शन सावतांना झाले
शेतकरी बांधवानो
शेती कार्य श्रेष्ठ झाले

**– धोंडीरामसिंह राजपूत**

# वैजापूरात संत सावता महाराज व संत नामदेव पुण्यतिथी निमित्त अखंड हरिनाम सप्ताह



वैजापूर, दि. ७ (प्रतिनिधी) – पुढील आठवड्यात असलेल्या अनुक्रमे संत नामदेव महाराज पुण्यतिथी व संत सावता महाराज पुण्यतिथी निमित्त येथील श्री. संत सावता महाराज मंदिर माळी गल्ली व संत सावता महाराज मंदिर आनंदनगर येथे बुधवार (ता.५) पासून काकडा आरती,हरिपाठ,किर्तन, प्रवचन व अखंड हरिनाम सप्ताह निमित्त श्रीमद भागवत कथा कीर्तन सोहळा आरंभ झालेला आहे. ता. १२ बुधवार रोजी काल्याच्या किर्तनाने या सप्ताहाची सांगता होणार आहे. गुरुवार (ता,०६) रोजी माळी गल्ली येथे संत सावता महाराज मंदिरासमोर ह.भ.प. अशोक महाराज सत्रे (लाख पानव)यांचे कीर्तन सायंकाळी सात ते नऊ दरम्यान झाले. आपल्या अमृत वाणीतून त्यांनी उपस्थित भक्त भाविकांना जीवनातील येणाऱ्या चढ-उतारांना संयम व धैर्याने सामोरे जाण्याचे आवाहन दिले. संत सावता महाराज यांनी कष्टाला देव मानले तसे या भूतलावरील सर्वांनी कष्टातच देव असतो हे तत्व अंगीकारून आपल्या जीवनातही कष्ट व परिश्रम करावे व जीवन सुखी, समृद्धी करावे असेही महाराज पुढे म्हणाले. संत सावता महाराजानी शेती कष्टाला प्राधान्य दिले तसे आपणही शेती कष्ट करू या, असे सत्रे महाराज पुढे म्हणाले.या प्रसंगी संयोजक मेजर गौतम गायकवाड, सजनराव गायकवाड, जीवन राजपूत, सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत व भक्त भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माजी सैनिकांच्या पाल्यांना शैक्षणिक आर्थिक मदत ३० सप्टेंबरपर्यंत प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि. ७ (जिमाका) : जिल्ह्यातील माजी सैनिक, त्यांच्या पत्नी, विधवा तसेच पाल्यांसाठी विविध शैक्षणिक अभ्यासक्रमांकरिता एकरकमी आर्थिक मदत देण्यात येणार आहे. पात्र लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह आपले प्रस्ताव दि. ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे सादर करावेत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

या योजनेअंतर्गत इयत्ता दहावीच्या परीक्षेत किमान ६० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या पाल्यांना आर्थिक मदत दिली जाते. तसेच इयत्ता दहावी अथवा बारावीच्या परीक्षेत किमान ६० टक्के गुण मिळवून अभियांत्रिकी व तत्सम पदविका अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या पाल्यांनाही या योजनेचा लाभ घेता येणार आहे.

इयत्ता बारावीच्या परीक्षेत किमान ६० टक्के गुण मिळवून वैद्यकीय, अभियांत्रिकी, आयुर्वेदिक तसेच अन्य पदवी अभ्यासक्रमांसाठी पुढील शिक्षण घेणारे पाल्यही आर्थिक मदतीसाठी पात्र आहेत. त्याचप्रमाणे कला, विज्ञान, अध्यापक विद्यालय, अध्यापक महाविद्यालय, विधी, पदविका व अन्य तांत्रिक शैक्षणिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या पाल्यांसाठीही योजनेत आर्थिक मदतीची तरतूद आहे. पदवी परीक्षेत किमान ६० टक्के गुण मिळवून पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या पाल्यांना तसेच इयत्ता बारावीच्या परीक्षेत ६० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवून परराज्यात व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या माजी सैनिक अथवा विधवांच्या पाल्यांनाही नियमानुसार एकरकमी आर्थिक मदतीचा लाभ मिळणार आहे.

पात्र माजी सैनिक, विधवा व त्यांच्या पाल्यांनी योजनेसाठी आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे जोडून परिपूर्ण प्रस्ताव निर्धारित मुदतीत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात सादर करावा. जिल्ह्यातील जास्तीत जास्त पात्र लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे.

# संत रविदास महाराजांचे विचार तळागाळापर्यंत पोहोचविणार – विश्वजीत गायकवाड



छत्रपती संभाजीनगर, दि. ७ (प्रतिनिधी) – जगतगुरू संत शिरोमणी गुरु रोहिदास महाराज यांच्या ६५०व्या जयंतीनिमित्त 'समरसता संकल्प अभियान' अंतर्गत शुक्रवार, ७ ऑगस्ट रोजी सकाळी ११.३० वाजता मुकुंदवाडी येथे कलश पूजन व कलश वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.

सामाजिक समरसता, बंधुभाव आणि संत रोहिदास महाराजांच्या समतेच्या विचारांचा प्रसार करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. संत रोहिदास महाराजांच्या ६५०व्या जयंतीनिमित्त देशभरात विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. त्याच



अभियानाचा एक भाग म्हणून छत्रपती संभाजीनगरातील मुकुंदवाडी येथे हा सोहळा आयोजित करण्यात आल्याची माहिती भाजप अनुसूचित जाती मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष विश्वजीत अनिलकुमार गायकवाड यांनी दिली. संत रोहिदास महाराजांच्या पावन जन्मभूमी काशी (वाराणसी) येथून आणलेल्या पवित्र कलशांचे विधिवत पूजन करण्यात आले. त्यानंतर हे कलश भाविकांना वितरित करण्यात आले. या माध्यमातून संत रोहिदास महाराजांचा समतेचा, बंधुभावाचा आणि सामाजिक एकतेचा संदेश समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचविण्याचा संकल्प करण्यात आला. यावेळी विश्वजीत गायकवाड म्हणाले, संत रविदास महाराजांचे समता, बंधुभाव आणि सामाजिक एकतेचे विचार तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. काशी येथून आणलेल्या पवित्र कलशांचे पूजन करून त्यांचे भाविकांना वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाला सर्व समाज बांधवांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. त्याबद्दल मी सर्वांचे मनापासून आभार मानतो.

कार्यक्रमाचे उद्घाटन प्रदेशाध्यक्ष रविंद्र (दादा) चव्हाण यांच्या हस्ते झाले. नारायण भाऊ कुचे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी आमदार, खासदार, संत-महंत, विविध पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला तसेच समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. संत रोहिदास महाराजांच्या समतेच्या विचारांना समाजजीवनात रुजविण्यासोबतच सर्व समाजघटकांमध्ये बंधुभाव आणि सामाजिक एकात्मता निर्माण करण्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

# खुलताबाद गटशिक्षणाधिकाऱ्यांचे एमपीएससीमध्ये यश, श्रद्धा ताटे यांची सहाय्यक आयुक्तपदी निवड

विजय चौधरी, खुलताबाद

खुलताबाद पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी श्रद्धा दीपक ताटे यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने एमपीएससी घेतलेल्या स्पर्धा परीक्षेत उल्लेखनीय संपादन केले आहे. त्यांची मुंबई येथे राज्य कर सहाय्यक आयुक्त (असिस्टंट कमिशनर ) पदी निवड झाली आहे. नोकरी मिळाली म्हणून अभ्यास करणे सोडून न देता त्यांनी जिद्दीने सातत्यपूर्ण अभ्यास सुरूच ठेवला. नोकरी करत असतानाही स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू ठेवून त्यांनी हे यश संपादन केले आहे. हे विशेष !

स्पर्धा परीक्षा म्हटले की, कधी यश येते, तर कधी अपयश... पण कोणत्याही स्पर्धा परीक्षेचा अभ्यास नीट समजून घेत वेळेचे नियोजन केले तर यशाची पायरी चढता येते, हेच बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ येथील सामान्य कुटुंबातील श्रद्धा दीपक ताटे या तरुणीने सिद्ध केले आहे. तिचे प्राथमिक शिक्षण परळी वैजनाथ येथील श्री सरस्वती विद्यालय शाळेत झाले. पुढे तिने स्वामी विवेकानंद महाविद्यालयात पदवीपर्यंतचे शिक्षण घेतले. यापूर्वी खुलताबाद पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी श्रद्धा ताटे यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या चार वेळा मुलाखती दिल्या आहेत. यामध्ये २०२३ मध्ये मुंबई मंत्रालयात सहाय्यक कक्ष अधिकारी पदासाठी त्यांची निवड झाली होती. २०२४ मध्ये सरकारी कामगार अधिकारी म्हणून त्यांनी नाशिक येथे काम पाहिले. २०२५ – २६ मध्ये खुलताबाद पंचायत समितीमध्ये गटशिक्षणाधिकारी म्हणून त्यांनी काम केले आहे. आता त्यांची मुंबई येथे 'सहाय्यक राज्यकर आयुक्त' पदी नियुक्ती झाली आहे.

**तरुणांसाठी प्रेरणादायी यश–**

प्रशासकीय सेवेत कार्यरत असतानाही उच्च ध्येय साध्य करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहण्याची त्यांची जिद्द उल्लेखनीय मानली जात आहे. कर्तव्यदक्ष प्रशासन, चिकाटी आणि सातत्यपूर्ण अभ्यास याच्या जोरावर श्रद्धा ताटे यांनी मिळवलेले हे यश तरुण पिढीसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# 'संपर्क, संवाद आणि समाधान या त्रिसूत्रीतून नागरिकांना तत्पर सेवा द्या-विभागीय आयुक्त जी.श्रीकांत

## महसूल दिनानिमित्त उत्कृष्ट अधिकारी-कर्मचारी, सेवानिवृत्त अधिकारी व गुणवंत पाल्यांचा गौरव






छत्रपती संभाजीनगर दि.७ (प्रतिनिधी)- बदलत्या काळात नागरिकांच्या शासनाकडून असलेल्या अपेक्षाही बदलत आहेत. आजच्या पिढीला शासकीय सेवा जलद, सुलभ आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून उपलब्ध व्हाव्यात, अशी अपेक्षा आहे. त्यामुळे महसूल प्रशासनाने पारंपरिक कार्यपद्धतीत आवश्यक बदल करून नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार करावा. 'संपर्क, संवाद आणि समाधान' या त्रिसूत्रीच्या आधारे नागरिकांना तत्पर आणि लोकाभिमुख सेवा द्यावी, असे आवाहन विभागीय आयुक्त जी श्रीकांत यांनी आज येथे केले.

महसूल दिनानिमित्त महात्मा गांधी मिशन महाविद्यालयातील रुख्मिणी सभागृहात आयोजित अधिकारी-कर्मचारी गौरव समारंभात ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., पोलीस आयुक्त प्रवीण पवार, महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मित्रू पी.एम., पोलीस अधीक्षक (ग्रामीण) प्रकाश जाधव यांच्यासह अपर जिल्हाधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, नायब तहसीलदार तसेच महसूल प्रशासनातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

विभागीय आयुक्त म्हणाले की, महसूल विभाग हा शासन व्यवस्थेचा महत्त्वाचा कणा असून शासन आणि सर्वसामान्य नागरिकांना जोडणारी महत्त्वाची यंत्रणा आहे. शासनासमोर कोणतेही मोठे आव्हान अथवा महत्त्वाची जबाबदारी आली की महसूल प्रशासनाची भूमिका अग्रस्थानी असते. त्यामुळे प्रत्येक अधिकारी-कर्मचाऱ्याने आपल्या जबाबदारीचे महत्त्व ओळखून नागरिककेंद्री दृष्टिकोनातून काम करणे आवश्यक आहे.

आजची नवी पिढी वेग, तत्परता आणि तंत्रज्ञानाला प्राधान्य देते. नागरिकांना शासकीय सेवा घेण्यासाठी वारंवार कार्यालयात येण्याची गरज भासू नये. शक्य तितक्या सेवा नागरिकांना त्यांच्या घराजवळ किंवा तंत्रज्ञानाच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्याची व्यवस्था निर्माण करावी. 'शासन आपल्या दारी' ही संकल्पना प्रत्यक्ष सेवेत उतरली पाहिजे. खासगी क्षेत्रातील अनेक सेवा घरपोच मिळत असताना शासकीय सेवाही अधिक सुलभ, पारदर्शक आणि गतिमान करण्यासाठी प्रशासनाने प्रयत्न करावेत, असे त्यांनी सांगितले.

केवळ स्मार्टफोनचा वापर म्हणजे स्मार्ट प्रशासन नव्हे, तर नागरिकांना सेवा किती सुलभ, जलद आणि स्मार्ट पद्धतीने देता येतात, यावर प्रशासनाची कार्यक्षमता ठरते. नवीन तंत्रज्ञान आत्मसात करून प्रत्येकाने आपल्या कार्यपद्धतीत आवश्यक बदल करावा. बदलत्या काळानुसार आपण स्वतःमध्ये बदल केला नाही, तर बदलती व्यवस्था आपल्याला बदलण्यास भाग पाडेल, असेही त्यांनी सांगितले.

'संपर्क, संवाद आणि समाधान' ही प्रशासनासाठी महत्त्वाची त्रिसूत्री आहे. अधिकारी-कर्मचाऱ्यांनी नागरिकांशी सातत्याने संपर्क ठेवावा, सकारात्मक संवाद साधावा आणि त्यांच्या प्रश्नांचे समाधान करण्यावर भर द्यावा. नागरिकांना त्यांच्या हक्काच्या सेवांसाठी आंदोलन अथवा उपोषण करण्याची वेळ येऊ नये. नियमानुसार मिळणाऱ्या सेवा अनावश्यक पाठपुरावा न करता वेळेत मिळाल्या पाहिजेत. अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सन्मान हा केवळ त्यांच्या पदामुळे नव्हे, तर कामातून निर्माण झाला पाहिजे. निवृत्तीनंतरही नागरिकांनी आदराने आठवण काढावी, असे काम प्रत्येकाने करावे. जमिनीशी जोडलेले राहून सर्वसामान्यांच्या प्रश्नांकडे संवेदनशीलतेने पाहावे, असे आवाहन विभागीय आयुक्तांनी केले.

जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. म्हणाले की, नागरिकांसाठी शासन म्हणजे कोणताही एक विभाग नसून संपूर्ण प्रशासन असते. नागरिकांचा प्रश्न महसूल, कृषी, पोलीस किंवा अन्य कोणत्या विभागाशी संबंधित आहे, यापेक्षा त्यांचे काम वेळेत होणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे विभागांच्या कार्यकक्षेचे कारण देत जबाबदारी एकमेकांकडे ढकलण्याऐवजी 'होल ऑफ गव्हर्नमेंट' दृष्टिकोनातून सर्व विभागांनी परस्पर समन्वय आणि प्रभावी संवादातून काम करावे.

विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण (एईं), आपत्ती व्यवस्थापन, निवडणूक प्रक्रिया, अतिक्रमण नियमानुकूल करणे अथवा हटविणे तसेच जमीनविषयक कामे एका विभागापुरती मर्यादित नसतात. अनेक विभागांच्या समन्वयातून ही कामे पूर्ण होतात. त्यामुळे वरिष्ठ स्तरापासून क्षेत्रीय स्तरापर्यंत समन्वयाची कार्यसंस्कृती अधिक मजबूत करणे आवश्यक आहे. महसूल प्रशासनातील अधिकारी-कर्मचाऱ्यांमध्ये उत्तम क्षमता आणि कार्यकुशलता आहे. सर्वांनी लोकाभिमुख दृष्टिकोनातून एकत्रितपणे काम केल्यास छत्रपती संभाजीनगर जिल्हा राज्यात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या जिल्ह्यांमध्ये अग्रस्थानी येईल, असा विश्वास जिल्हाधिकारी श्री. गौडा यांनी व्यक्त केला.

पोलीस आयुक्त प्रवीण पवार म्हणाले की, आपत्तीची परिस्थिती असो, पंचनामे व मदत वाटप असो, पीक कर्जमाफीची अंमलबजावणी असो किंवा शासनाच्या विविध महत्त्वाकांक्षी योजना व प्रकल्प असोत; प्रत्येक ठिकाणी प्रत्यक्ष क्षेत्रात उतरून काम करणारी यंत्रणा म्हणून महसूल विभागाची ओळख आहे. त्यामुळे नागरिकांसह संपूर्ण प्रशासनाचा महसूल यंत्रणेवर दृढ विश्वास आहे.

महसूल विभागाचे काम नागरिकांच्या जीवनाशी थेट संबंधित असून त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडविण्याची क्षमता या विभागात आहे. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांसह त्यांच्या कुटुंबीयांचेही त्यांनी अभिनंदन केले. शासकीय जबाबदाऱ्या पार पाडताना अधिकारी-कर्मचाऱ्यांनी स्वतःच्या आरोग्याची, कुटुंबाची आणि मुलांच्या शिक्षणाचीही काळजी घ्यावी. महसूल संघटना आणि कल्याण समित्यांच्या माध्यमातून अधिकारी-कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांसाठी विविध कल्याणकारी उपक्रम राबवावेत, असे आवाहन श्री. पवार यांनी केले. महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे म्हणाले की, महसूल प्रशासन हा शासन व्यवस्थेचा महत्त्वाचा कणा असून शासनाच्या विविध योजना, आपत्ती व्यवस्थापन आणि नागरिकांशी निगडित महत्त्वाच्या कामांमध्ये महसूल यंत्रणा क्षेत्रीय स्तरावर महत्त्वाची भूमिका बजावते. विविध विभागांतील परस्पर सहकार्य, समन्वय आणि लोककल्याणाची भावना कायम ठेवून अधिक प्रभावीपणे कार्य करावे, असे त्यांनी सांगितले. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मित्रू पी. एम. यांनी महसूल दिनानिमित्त सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांना शुभेच्छा दिल्या. महसूल प्रशासनाशी आपले विशेष नाते असून यापूर्वी उपविभागीय अधिकारी म्हणून महसूल दिन साजरा करण्याची संधी मिळाली होती. आता जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून या कार्यक्रमात सहभागी होताना आनंद होत असल्याचे त्यांनी सांगितले. महसूल विभाग आणि जिल्हा परिषद या दोन्ही यंत्रणांचा ग्रामीण भागातील नागरिकांशी थेट संबंध आहे. त्यामुळे क्षेत्रीय स्तरावर महसूल अधिकारी-कर्मचाऱ्यांनी ग्रामसेवक आणि जिल्हा परिषदेच्या क्षेत्रीय यंत्रणेशी समन्वय राखून काम केल्यास नागरिकांची कामे अधिक जलद आणि प्रभावीपणे मार्गी लागतील. प्रशासकीय कामाचा व्याप सांभाळताना अधिकारी-कर्मचाऱ्यांनी स्वतःच्या आरोग्याचीही काळजी घ्यावी, असे आवाहन श्रीमती मित्रू पी.एम. यांनी केले. पोलीस अधीक्षक (ग्रामीण) प्रकाश जाधव यांनी महसूल दिनानिमित्त अधिकारी-कर्मचाऱ्यांना शुभेच्छा देत महसूल प्रशासनाच्या कार्याचे कौतुक केले. कायदा व सुव्यवस्था, निवडणूक प्रक्रिया, आपत्ती व्यवस्थापन तसेच विविध शासकीय योजना व उपक्रमांच्या अंमलबजावणीमध्ये पोलीस आणि महसूल प्रशासनाचा समन्वय अत्यंत महत्त्वाचा आहे. क्षेत्रीय स्तरावर दोन्ही यंत्रणांनी परस्पर संवाद, समन्वय आणि सहकार्य अधिक मजबूत केल्यास नागरिकांच्या समस्या अधिक प्रभावीपणे सोडविता येतील, असे त्यांनी सांगितले.

नागरिकांशी थेट संपर्क ठेवून शासनाच्या विविध योजना आणि सेवा तळागाळापर्यंत पोहोचविण्यात महसूल विभागाचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. आपत्ती तसेच अन्य आव्हानात्मक परिस्थितीत महसूल आणि पोलीस यंत्रणा समन्वयाने काम करतात. ही समन्वयाची परंपरा अधिक मजबूत करून नागरिकांना तत्पर सेवा देण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे कार्य करावे, असे आवाहन श्री. जाधव यांनी केले.

**सेवानिवृत्त अधिकारी व गुणवंत पाल्यांचा गौरव**

महसूल विभागातून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले अपर जिल्हाधिकारी अनंत गव्हाणे, डॉ. भारत कदम आणि राजेश काटकर यांचा त्यांच्या प्रदीर्घ शासकीय सेवेबद्दल विशेष सत्कार करण्यात आला. तसेच अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या गुणवंत पाल्यांचाही गौरव करून त्यांच्या शैक्षणिक यशाचे कौतुक करण्यात आले.

**उत्कृष्ट अधिकारी-कर्मचाऱ्यांचा गौरव**

महसूल दिनानिमित्त उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. अपर जिल्हाधिकारी संवर्गात संभाजी अडगुणे, उपजिल्हाधिकारी संवर्गात जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी व उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) एकनाथ बंगाळे, तहसीलदार संवर्गात छत्रपती संभाजीनगरचे तहसीलदार शिवानंद बिडवे आणि सोयगावच्या तहसीलदार मनीषा मेने यांचा सत्कार करण्यात आला.

नायब तहसीलदार संभाजी देशमुख, अनिता खुणे, लघुलेखक दत्तात्रय आटुळे, सहायक महसूल अधिकारी संवर्गातील दिनेश हापत, राजू देवळे, आकाश आरमाळ, गोपीनाथ जैवळ, सतीश पेंडसे आणि गजानन चिपडे यांचाही उत्कृष्ट कामगिरीबद्दल गौरव करण्यात आला. तसेच मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, महसूल सहायक, वाहनचालक, शिपाई, महसूल सेवक आणि पोलीस पाटील आदी विविध संवर्गांतील उत्कृष्ट अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

# सफाई कामगारांना सदनिकांचा लाभ द्यावा; महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगचे उपाध्यक्ष मुकेश सारवान यांचे मनपाला निर्देश




छत्रपती संभाजीनगर दि.७ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोग मुंबई उपाध्यक्ष मुकेश सारवान यांनी गुरुवारी छत्रपती संभाजी नगर महानगरपालिका येथे भेट देऊन सफाई मजुरांच्या समस्या जाणून घेतल्या यावेळी आयोजित बैठकीमध्ये त्यांनी महानगरपालिका प्रशासनाला सफाई मजुरांच्या विविध समस्या सोडवण्याचे निर्देश दिले.

महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोग मुंबई उपाध्यक्ष मुकेश सारवान यांच्या प्रमुख उपस्थितीत छत्रपती संभाजीनगर मनपा मुख्यालय येथे सफाई कामगारांच्या समस्यांबाबत आढावा बैठक घेण्यात आली,

या बैठकीत आयुक्त अमोल येडगे ,अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील ,अतिरिक्त आयुक्त कल्पिता पिंपळे,शहर अभियंता संजय कोंबडे,उप आयुक्त नंदकिशोर भोंबे ,उप आयुक्त अपर्णा थेटे, उप आयुक्त विकास नेवाळे,अंकुश पांढरे ,अभय प्रामाणिक कार्यकारी अभियंता अमोल कुलकर्णी यांच्यासह विविध कामगार कर्मचारी संघटनांचे प्रतिनिधी आणि पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी विविध संघटनांनी आयोगाला निवेदने सादर केली त्यावर आयोगाचे उपअध्यक्ष सारवन यांनी सफाई मजुरांच्या समस्या सोडवण्याचे निर्देश दिले त्यामध्ये प्रामुख्याने

शासन निर्णयातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजना बाबत २५ वर्षे किंवा त्याहून अधिक सेवा झालेल्या सफाई कामगारांना मालकी तत्वावर मोफत सदनिका देणे बाबत सद्यस्थितीचा आढावा त्यांनी घेतला. त्यावर योग्य कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

शासन निर्णयातील दूषित गटारा मध्ये काम करताना मृत्यू पावलेल्या /कायम अपंगत्व/ अपंगत्व आलेल्या सफाई कामगारांना नुकसान भरपाई अदा करणेबाबत सद्यस्थितीत प्रकरणाची माहिती घेऊन त्यावर योग्य कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. शासन निर्णयातील तरतुदीनुसार वारसा हक्काच्या प्रलंबित प्रकरणांची माहिती व सफाई कामगारांचे मंजूर पदे,भरलेली पदे व रिक्त पदांची माहिती त्यावर योग्य कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

तसेच महानगरपालिकेतील सफाई कर्मचाऱ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता शासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांचा आढावा त्यावर योग्य कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. महानगरपालिकेला दिलेले सूचना आणि निर्देशाची पुढील पंधरा दिवसांमध्ये पूर्तता करून अहवाल सादर करण्याच्या सूचना देखील आयोगाच्या वतीने मनपा प्रशासनाला देण्यात आल्या आहेत.

# विकसित मराठवाड्यासाठी सर्वांनी आपले दायित्व पूर्ण करावे-विभागीय आयुक्त जी. श्रीकांत

## विकसित मराठवाडा-२०३० धोरण राबविण्याबाबत प्रादेशिक विभाग प्रमुखांची आढावा बैठक

छत्रपती संभाजीनगर दि.७ (प्रतिनिधी)- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 'विकसित महाराष्ट्र' या संकल्पनेच्या धर्तीवर 'विकसित मराठवाडा' साकार करण्यासाठी सर्व प्रशासकीय विभागांनी परस्पर समन्वयाने काम करत विकासासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी आज येथे केले. तसेच सर्वांच्या सहभागातून विकसित मराठवाड्याचे स्वप्न साकार करण्याचा मनोदय त्यांनी यावेळी व्यक्त केला.

येथील स्मार्ट सिटी कार्यालयात विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्या अध्यक्षतेखाली विकसित महाराष्ट्र कृती आराखडा २०३० अंमलबजावणी अंतर्गत 'विकसित मराठवाडा' संकल्पना राबविण्याबाबत सर्व प्रादेशिक विभाग प्रमुखांसोबत प्रथम बैठक संपन्न झाली, यावेळी ते बोलत होते. बैठकीस सह आयुक्त (साप्रवि) मंजूषा मिसकर, सहआयुक्त (नियोजन) सुनील सुर्यवंशी यांच्यासह सर्व प्रादेशिक विभाग प्रमुख, प्रतिनिधी उपस्थित होते.

विभागीय आयुक्त जी. श्रीकांत म्हणाले, मराठवाड्याची 'मागास भाग' अशी असलेली प्रतिमा बदलून विकासाचे नवे पर्व सुरू करण्यासाठी प्रत्येक विभागाने जबाबदारीने आणि एकात्मतेने कार्य करणे आवश्यक आहे. शासनाच्या विविध योजना, लोकसहभाग आणि विकास कामांच्या प्रभावी अंमलबजावणीच्या माध्यमातून मराठवाड्याला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणायचे आहे. यासाठी प्रत्येक विभागाच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी 'वॉर रूम' तयार करण्यात येणार असून त्या माध्यमातून प्रलंबित तथा प्राध्यान्याच्या विषयांचे निराकरण केले जाणार आहे.

त्याचबरोबर विभागातील प्रकल्पांसंबंधी मंत्रालय स्तरावर कसलीही समस्या असल्यास तत्काळ व्हॉट्सअप क्रमांकावर संदेश पाठवावा, त्या समस्येचा माझ्या स्तरावर निराकरण करणार असल्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

विकसित महाराष्ट्र २०३० अंमलबजावणी अंतर्गत



विकसित मराठवाडा कृती आराखड्याची प्रभावी आणि कालबद्ध अंमलबजावणी करण्यासाठी सर्व विभागांनी शासनाच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. प्रत्येक विभागाने निश्चित उद्दिष्टे, कालमर्यादा आणि कृती आराखड्यानुसार कामकाज करून प्रगतीची नियमित समीक्षा करावी. विभागांमध्ये आवश्यक समन्वय राखत प्रलंबित प्रकरणांचा तातडीने निपटारा करावा तसेच गुणवत्तापूर्ण, पारदर्शक आणि परिणामकारक अंमलबजावणी करण्यावर विशेष भर द्यावा, असे निर्देशही विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी दिले.

तसेच राज्याची अर्थव्यवस्था २०३० पर्यंत एक ट्रिलियन अमेरिकन डॉलर करण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी विकसित महाराष्ट्र २०४७ व्हिजन डॉक्युमेंट तयार करण्यात आले असून मंत्रालयातील संबंधित विभागांनी विकसित महाराष्ट्र २०३० पर्यंत तयार केलेला कृती आराखडा प्रादेशिक स्तरावर प्राप्त करून त्याच्याशी सुसंगत असा सुधारित जिल्हा विकास आराखडा (डीएसपी)प्रत्येक जिल्ह्याने तयार करावा. हा आराखडा संबंधित जिल्हा नियोजन समितीच्या मान्यतेनंतर शासनास सादर करण्यात यावा. तसेच मंत्रालयीन विभागांनी अंतिम केलेले कृती आराखडे प्रादेशिक विभाग प्रमुखांनी जिल्हास्तरीय यंत्रणाप्रमुखांना उपलब्ध करून दयावयाचे आहेत. या प्रक्रियेच्या आधारे मराठवाड्याच्या स्थानिक गरजा, उपलब्ध संसाधने आणि विकासाच्या प्राधान्येक्रमानुसार विचार करून मराठवाड्याच्या शाश्वत विकासासाठी 'विकसित मराठवाडा २०३०' धोरणाची प्रभावी व कालबद्ध अंमलबजावणी करण्यात यावी, असे निर्देशही जी. श्रीकांत यांनी यावेळी दिले.

जी. श्रीकांत म्हणाले, मराठवाड्यामध्ये आंतराष्ट्रीय स्तरावरील गुंतवणूक होत आहे. या पार्श्वभुमीवर मराठवाड्यातील मोठ्या प्रमाणातील तरूणांना येथेच रोजगार मिळण्याच्या दृष्टीने औद्योगिक प्रशिक्षण व कौश्यल्य विकासावर आधारीत गुणवत्तापुर्वक शिक्षण मोठ्या प्रमाणात उपलब्ध होण्यासाठी संबंधित विभागाने पुढाकार घ्यावा. विभागांनी आपल्या सेवा डिजिटल पध्दतीने नागरिकांना उपलब्ध करून देत उत्कृष्ट विभाग बनन्यासाठी प्रत्येक विभाग प्रमुखांनी प्रयत्न करण्याची त्यांनी सूचना केली.

तसेच मराठवाड्याच्या विकास कामात कुठल्याही प्रकारची हयगय अथवा आडकाठी करणाऱ्यांची गय केली जाणार नाही, असे सुचित करून, 'आपण सर्वांच्या सहभागातून विकसित मराठवाड्याचे स्वप्न साकार करूया,' असा निर्धार त्यांनी यावेळी व्यक्त केला.

# मी कुणाला भेटायचं हे मीच ठरवणार; अभिजित दिपकेंनी पीएसआयला घराबाहेर काढले

## पाळत ठेवण्यासाठी अमेरिकन एआय कंपन्यांची मदत घेताय का?, सरकारला सवाल

छत्रपती संभाजीनगर दि.७ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगरमध्ये अभिजित दिपके यांच्या निवासस्थानी भेटीसाठी येणाऱ्या नागरिकांना पोलिस उद्धट वागणूक देत असल्याचा आरोप करत त्यांनी एका पीएसआयला जाब विचारल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर चर्चेत आला आहे. 'मला कोणाला भेटायचं हे पोलिस ठरवणार नाहीत, तो निर्णय मी घेईन,' असे दिपके यांनी सांगितले. या घटनेनंतर पोलीस आणि दिपके यांच्यातील संवादाचा व्हिडिओ मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.

दरम्यान, माझ्यावर पाळत ठेवण्यासाठी केंद्र सरकार अमेरिकन एआय कंपन्यांची मदत घेत आहे का, असा सवालही दिपके यांनी केलाय. त्यांनी सोशल मीडियावर दोन पोस्ट करून आपल्यावर पाळत ठेवल्याचा आरोप केलाय. यावर अजून सरकारकडून कसलेही उत्तर आले नाही.

सोशल मीडियावर अभिजीत दिपके यांचा एक व्हिडिओ व्हायरल होत आहे. या व्हिडिओमध्ये ते एका पोलीस उपनिरीक्षकाला थेट घराबाहेर हाकलून लावताना दिसत आहेत. आपल्याला भेटण्यासाठी येणाऱ्या सामान्य नागरिकांना पोलीस अत्यंत उद्धट वागणूक देत असल्याचा आरोप दिपके यांनी केला आहे. पोलिसांच्या या दंडेलशाहीवर संताप व्यक्त करत, 'मी कुणाला भेटायचं, हे पोलिसांनी मला सांगायची गरज नाही. मी कुणाला भेटणार हे केवळ मीच ठरवणार,' असे आक्रमक शब्दांत सुनावत त्यांनी त्या पोलीस अधिकाऱ्याला तिथून जाण्यास सांगितले.

दुसरीकडे, अमेरिकेतील एका एआय स्टार्टअपने फ्युचरक्राईम समिट २०२६ मध्ये आपल्या एआय टूलमध्ये स्वतःची माहिती वापरल्याचा आरोप करत अभिजित दिपके यांनी सरकारवर गंभीर प्रश्न उपस्थित केले. 'माझी माहिती वापरण्याची परवानगी कोणी दिली?' असा सवाल त्यांनी सोशल मीडियावर केला.

सोशल मीडियावर केलेल्या पोस्टमध्ये अभिजित दिपके यांनी सरकारला सवाल विचारला. आपल्या एक्स पोस्टमध्ये ते म्हणतात, 'भारत मंडपम येथे आयोजित 'फ्युचरक्राइम समिट २०२६' दरम्यान, अमेरिकेतील रे सिक्युरिटी या एआय स्टार्टअप कंपनीने त्यांचे एआय टूल सादर करण्यासाठी माझी वैयक्तिक माहिती सर्वांसमोर प्रदर्शित केली. या परिषदेला उपस्थित असलेल्या एका व्यक्तीने मला सांगितल्यानुसार, ही घटना अनेक सरकारी अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत घडली. आपल्यावर पाळत ठेवण्यासाठी सरकार अमेरिकन कंपन्यांची मदत घेत आहे का?' असा सवाल त्यांनी केला.

तसेच ' भारत मंडपममध्ये एक कार्यक्रम सुरू आहे, जिथे एका कंपनीने त्यांचे एआय टूल प्रदर्शित करण्याच्या उद्देशाने माझी माहिती उघड केली आहे. याला परवानगी कशी दिली गेली?' असा प्रश्नही त्यांनी केला.

याचवेळी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १५ ऑगस्टच्या भाषणात जनरेशन झेड आणि तरुणांच्या प्रश्नांवर भाष्य करावे, अशी मागणीही केली. दरम्यान, छत्रपती संभाजीनगर येथील सीजेपीच्या बैठकीत देशभरातील नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी मोहीम राबवण्याचा, शिक्षण शुल्काच्या प्रश्नावर आंदोलन छेडण्याचा आणि १२ सदस्यीय कार्यकारिणी जाहीर करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहितीही दिपके यांनी दिली.

# समस्याग्रस्त व पीडित महिलांसाठी १७ ऑगस्ट रोजी 'महिला लोकशाही दिन'

छत्रपती संभाजीनगर दि.७ (प्रतिनिधी)- समस्याग्रस्त व पीडित महिलांना त्यांच्या समस्या व अडीअडचणी शासकीय यंत्रणेसमोर मांडण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे तसेच त्यांच्या तक्रारींचे तातडीने निवारण करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागाच्या निर्देशानुसार सोमवार, दि. १७ ऑगस्ट २०२६ रोजी जिल्हास्तरीय 'महिला लोकशाही दिना'चे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील महिलांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन महिला व बाल विकास विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनाचे आयोजन दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी करण्यात येते. त्यानुसार ऑगस्ट महिन्यात सोमवार, दि. १७ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, छत्रपती संभाजीनगर येथे महिला लोकशाही दिन होणार आहे.

महिलांच्या हक्कांचे संरक्षण करणे, त्यांच्या तक्रारींची शासकीय यंत्रणेमार्फत कायदेशीर व विहित कालमर्यादेत सोडवणूक करणे तसेच समस्याग्रस्त महिलांना योग्य न्याय व आवश्यक मार्गदर्शन मिळवून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

महिला लोकशाही दिनात तक्रार किंवा निवेदन सादर करताना अर्ज विहित नमुन्यात असणे आवश्यक आहे. तक्रार अथवा निवेदन वैयक्तिक स्वरूपाचे असावे तसेच अर्ज दोन प्रतींमध्ये सादर करावा. आस्थापनाविषयक, सेवाविषयक तसेच न्यायप्रविष्ट प्रकरणांशी संबंधित अर्ज या उपक्रमांतर्गत स्वीकारले जाणार नाहीत.

जिल्ह्यातील महिलांच्या वैयक्तिक, कौटुंबिक अथवा शासकीय कार्यालयांशी संबंधित अर्जांबाबत काही तक्रारी किंवा अडचणी असल्यास त्यांनी विहित नमुन्यातील अर्ज आवश्यक कागदपत्रांसह निर्धारित वेळेत उपस्थित राहून सादर करावा. यावेळी संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित राहणार असून प्राप्त अर्ज व तक्रारींवर नियमानुसार तातडीने कार्यवाही करण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील जास्तीत जास्त समस्याग्रस्त व पीडित महिलांनी सोमवार, दि. १७ ऑगस्ट रोजी आयोजित जिल्हास्तरीय 'महिला लोकशाही दिना'चा लाभ घेऊन आपल्या तक्रारी व अडचणी प्रशासनासमोर मांडाव्यात, असे आवाहन जिल्हा प्रशासन व महिला व बाल विकास विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

(पान १ वरुन)

## '...तर अण्णासाहेब पाटील महामंडळाच्या..

हे असेच सुरू राहिल्यास हे पद आपल्याला सोडावे लागेल, असा इशारा नरेंद्र पाटील यांनी यावेळी दिला. गेल्या काही वर्षापासून लाभार्थ्यांना कर्ज मंजूर करण्यासाठी आवश्यक असणारे संमती पत्र दिले जात नाहीत. व्याज परताव्याची रक्कम वेळेत मिळत नाही. मिळालेल्या कर्जाच्या तुलनेत १५०० कोटी रुपये मिळणे आवश्यक होते पण केवळ १५२ कोटी रुपये आतापर्यंत मिळाले आहेत.

व्यवस्थापकीय संचालकांचा मनमानी कारभार याला कारणीभूत असल्याचा आरोप पाटील यांनी केला. त्यांच्यावर कारवाई करावी किंवा त्यांची बदली व्हावी यासाठी आपण पत्रव्यवहार केला होता. मात्र यावर काहीच होताना दिसत नाहीये. आता यावरून मराठा समन्वयक आंदोलन करण्याच्या तयारीत असल्याचे नरेंद्र पाटील म्हणाले.

## मराठा समाजासाठी घेतलेले निर्णय बदलणार...

एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांनीच घेतली आहे, हे विसरता कामा नये.'' मराठा समाजाला आश्वस्त करतानाच, ओबीसी समाजालाही सामंत यांनी शब्द दिला आहे. ''मराठा समाजाला न्याय देत असताना ओबीसी समाजावरही कोणताही अन्याय होणार नाही, ही महाराष्ट्र सरकारची पहिल्यापासूनची ठाम भूमिका आहे. जर गरज पडली, तर ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांच्याशीही सरकार सकारात्मक चर्चा करण्यास तयार आहे,'' असे त्यांनी स्पष्ट केले.

## तृणमूल आणि ठाकरे सेनेतून फुटलेल्या...

राष्ट्रवादीच्या दोन खासदारही उपस्थित होते. काही दिवसांपूर्वी उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेतून सहा खासदारांनी एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला. तर, तृणमूल काँग्रेसच्या २० खासदारांनी एनसीपीमध्ये प्रवेश केला आहे. हे खासदार देखील यावेळी उपस्थित होते. फुटीर खासदारांशी संवाद साधताना मोदींनी त्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला.

## अख्खा महाराष्ट्र आठ वेळा पालथा घातलाय,...

अजितदादा आणि इतर नेत्यांसोबत मी काम केलं आहे. मी माझ्या आयुष्यात निवडणुकीचा सर्व्हे कधीही केला नाही. मला काय असल्या रणनीतीकार किंवा सर्व्हेची गरज नाही. मी फिल्डमध्ये काम करणारा आहे. गावातल्या लोकांना, तरुणाईला भेटल्यानंतर मला अंदाज येतो. मी आठवेळा महाराष्ट्र उलथापालथा केला आहे. राज्याचा कानाकोपरा मला माहिती आहे. चांद्यापासून बांद्यापासून मी माहिती सांगू शकतो.'' ते रणनीतीकार असतील, पण ते आमच्या पक्षासाठी काम करतात की नाही याची मला माहिती नाही. प्रशांत किशोर यांची नेमणूक झाली असती तर त्याची माहिती मला असती, असं सुनील तटकरे म्हणाले.


MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

**NOTICE INVITING e-TENDER**

| Sr. No. | Tender No. | Tender Details | Estimate Amount Rs. | EMD in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | 3000071238 | Work contract for maintenance, repairing and servicing of computers & peripherals along with misc. allied works as per scope of work at Vaitarna Division | 9,10,589.86 | 12,505.90 |

**Tender Cost:** Rs. 1180.00
**Contact Person:** Superintending Engineer, RENEWABLE ENERGY CIRCLE, Ghatghar
Tel.No. 0253 2810185/2810485
For further details visit our Web site : **https://eprocurement.mahagenco.in**
1. All interested vendors are requested to register to our web site for e-tender : **https://eprocurement.mahagenco.in**
2. Actual quantum of work is to be accessed by the bidder before submitting the tender documents.

**Superintending Engineer, REC, Ghatghar**